cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

नवरात्रोत्सवानिमित्त सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा !

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–१५१ | शुक्रवार, दि.२६ सप्टेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये







# मृतांच्या वारसांना ४ लाख, जनावरांसाठी ३७ हजार !

# पूरग्रस्तांसाठी सरकारकडून तातडीची मदत जाहीर

पुणे । प्रतिनिधी

यंदाच्या मुसळधार पावसाने आणि महापुराने राज्यात हाहाकार माजवला असून, जूनपासून आतापर्यंत ८४ जणांचा बळी गेला आहे. अनेकांची घरं वाहून गेली, हजारो घरांची पडझड झाली. या पार्श्वभूमीवर, राज्य सरकारने पूरग्रस्त भागांमध्ये तातडीने मदतकार्य सुरू केले असून, जिल्हाधिकाऱ्यांना थेट अधिकार देण्यात आले आहेत. निधीअभावी मदत थांबणार नाही यासाठी उणे बजेटमधूनही तरतूद करण्याचे आदेश शासनाने दिले आहेत.



शासनाने पूरग्रस्तांसाठी विविध प्रकारच्या आर्थिक मदतीची तरतूद जाहीर केली आहे. पूरामुळे मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ४ लाख रुपये, दुधाळ जनावर दगावल्यास ३७,५०० रुपये, ओढकाम करणाऱ्या जनावरांसाठी ३२ हजार रुपये, तर लहान ◀◀ पान २ वर

### शेत पिकांसाठी एवढी मदत

शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीसाठीही शासनाने भरपाई जाहीर केली आहे. कोरडवाहू पिकांसाठी ८,५०० रुपये प्रति हेक्टर, बागायती पिकांसाठी १७,००० रुपये प्रति हेक्टर आणि बहुवार्षिक पिकांसाठी २२,५०० रुपये प्रति हेक्टर अशी मदत मिळेल. पूरामुळे जमीन खरडून गेल्यास दुरुस्त होऊ शकणाऱ्या जमिनींसाठी १८,००० रुपये प्रति हेक्टर, तर दुरुस्त न होणाऱ्या जमिनींसाठी किमान ५,००० रुपये आणि कमाल ४७,००० रुपये प्रति हेक्टर मदत दिली जाईल.

### मदत तुटपूंजी

प्रत्यक्षात शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मात्र शासनाकडून भरीव मदतीची अपेक्षा असताना अत्यंत तुटपूंजी मदत मिळत असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी पसरली आहे.

## पीएम केअर फंडातून कर्जमुक्ती करा अन्यथा शेतकऱ्यासह रस्त्यावर उतरू

### उद्धव ठाकरे यांचा बीडमधून सरकारला इशारा



धाराशिव/बीड । प्रतिनिधी

अतिवृष्टीने शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले आहे. शेतातील पीक पूर्णपणे वाया गेले आहे, अशा काळात शेतकऱ्यांना आधार आणि मदत देण्याची गरज आहे. शासनाने पीएम केअर फंडामधील रकमेतून कर्जमुक्ती करावी, अन्यथा शिवसेना शेतकऱ्यांबरोबर रस्त्यावर उतरेल असा इशारा बीडमधून शिवसेनेचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत दिला.

धाराशिव आणि बीड तालुक्यातील पूरग्रस्त काही भागातील पाहणी केल्यानंतर शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी बीडमध्ये पत्रकार परिषद घेतली यावेळी त्यांच्यासमवेत खासदार संजय राऊत, माजी खासदार चंद्रकांत खैरे, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार मिलिंद नार्वेकर, बीड जिल्हा प्रमुख उल्हास गिराम, गणेश वरेकर यांची उपस्थिती होती. ◀◀ पान २ वर

## पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी महायुती सरकार खंबीरपणे उभा

### उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी दिली ग्वाही

बीड । प्रतिनिधी

बीडसह जिल्ह्यात अनेक ठिकाणी अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी महायुती सरकार खंबीरपणे उभे आहे. ज्यांच्या घरात पाणी शिरले अशा नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत व धान्य देण्याचे शासनाने ठरवले आहे, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी दिली.



बीड तालुक्यातील हिंगणी खुर्द येथे गुरुवारी (दि.२५) सकाळी ७ वाजता पूरस्थितीची पाहणी करून अजितदादा पवार यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मागील दोन दिवसांपासून पूरग्रस्त भागाला भेट देऊन ◀◀ पान २ वर

## बीडमध्ये आरक्षणासाठी ओबीसी तरुणाची आत्महत्या

बीड । प्रतिनिधी



मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण दिल्याने आपल्यावर अन्याय झाला, आता आपल्या मुलाबाळांना नोकऱ्या लागणार नाहीत, अशी खंत मनात ठेवत पेठ बीड भागातील साळी गल्ली, काळा हनुमान ठाणा येथील राहुल पतंगे या ३४ वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केली.

मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण दिल्यानंतर अनेक ठिकाणी आपल्या ताटात वाटेकरी झाल्याची खंत व्यक्त करत आपल्या मुलाबाळाचे काय होणार या नैराशेतून चार आत्महत्या घडल्या आहेत. यातच आता बीड शहरातील शाळे गल्ली भागातील एका तरुणाने याच विवंचनेतून आपली जीवन यात्रा संपवली. या दुःखद घटनेची माहिती मिळताच ओबीसी समाजातील नेत्यांनी पोलीस ठाण्याकडे धाव घेतली. त्याच्या कुटुंबीयांना धीर देत पेठ ◀◀ पान २ वर

## महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रभाग रचनेत हस्तक्षेप करण्यास सुप्रीम कोर्टाचा नकार !

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या प्रभाग रचनेमध्ये हस्तक्षेप करण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. या प्रकरणावर गुरूवारी (दि. २५) महत्त्वाची सुनावणी झाली. न्यायालयाने याचिकाकर्त्यांना स्पष्ट केले की, निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यावर या प्रकरणावर सुनावणी घेतली जाईल.



स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत चक्रानुक्रमे सुरू असलेल्या आरक्षणाला ब्रेक लागू नये, अशी मागणी याचिकाकर्त्यांनी केली होती. यावर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, सध्या सुरू असलेल्या प्रभाग रचनेमध्ये आणि आरक्षण प्रक्रियेमध्ये हस्तक्षेप केला जाणार नाही. निवडणुका झाल्यावरच या प्रकरणावर विचार केला जाईल. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानंतर याचिकाकर्ते रवींद्र ◀◀ पान २ वर

## माळ पाचवी



पंचमीचे दिवशीं व्रत
तें उपांगललिता हो ।
अर्घ्यपाद्यपूजनें तुजला
भवानी स्तविती हो ।
रात्रीचे समयीं करिती
जागरण हरिकथा हो ॥
आनंदें प्रेम तें आलें
सद्भावें क्रीडतां हो ॥ ५ ॥
उदो बोला उदो
अंबाबाई माउलीचा हो ।
उदोकारें गर्जती काय
महिमा वर्णू तिचा हो ॥

## शेतकऱ्यांना तात्काळ मदत करा नसता मुख्यमंत्री व मंत्र्यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही–सपकाळ




जालना । प्रतिनिधी

मराठवाड्यामध्ये मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांची कापूस सोयाबीन तूर मोसंबी व इतर पिकाची शंभर टक्के नुकसान झाले असून तसेच शेतातील माती पूर्ण वाहून गेली आता शेतामध्ये जाऊन पाहणी न करता तत्काळ शेतकऱ्याला मदत करा नसता मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही असे काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ जालना जिल्हा दौऱ्यावर आले असता जालना येथे स्पष्ट करा परिषद मध्ये बोलताना म्हणाले. राज्यात सुरू ◀◀ पान २ वर

## पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी आमदार वडेट्टीवार ६ महिन्यांचे वेतन देणार

मुंबई । प्रतिनिधी



राज्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सर्व स्तरातून आवाहन केले जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व मंत्री, आमदार आणि खासदार त्यांचे एक महिन्याचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी देणार आहेत. मंत्री छगन भुजबळ यांनी याआधीच आपले एक महिन्याचे वेतन पूरग्रस्तांच्या मदतीसाठी देणार असल्याचे सांगितले होते. आता काँग्रेस नेते, आमदार विजय वडेट्टीवार यांनी, अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ६ महिन्यांचे आमदार वेतन मुख्यमंत्री सहायत्ता निधीसाठी देणार असल्याचे जाहीर केले आहे.

सर्वपक्षीय आमदारांनीदेखील बळीराजासाठी पुढाकार घेत त्यांचे सहा महिन्यांचे आमदार वेतन द्यावे, असे त्यांनी म्हटले आहे.

पैशाचे सोंग आणता येत नाही म्हणून शेतकऱ्यांना आत्महत्या करून देणार का दादा? लाडकी बहीण योजनेकडे बोट दाखवताना ती योजना पण फक्त मतांसाठी आणली आहे. निवडणुकीआधी शेतकरी कर्जमाफीचे आश्वासन तुम्ही दिले, आता ◀◀ पान २ वर

## ५० टक्के आरक्षणाची भिंत तोडू !

### राहुल गांधींची आरक्षण मर्यादा वाढवण्याची ग्वाही

पाटणा / वृत्तसंस्था

स्वातंत्र्यानंतर प्रथमच बिहारमध्ये झालेल्या काँग्रेस कार्यकारिणी समितीच्या बैठकीत आगामी विधानसभा निवडणुकीसाठी प्रचाराचे रणशिंग फुंकण्यात आले. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सत्तेत आल्यास आरक्षणाची ५० टक्के मर्यादा वाढवून प्रत्येक जातीला लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्याचे आश्वासन दिले. देशभरात जातिनिहाय जनगणनेची मागणी करत त्यांनी



अतिमागासांसाठी दहा कलमी कार्यक्रम जाहीर केला. बिहार विधानसभेतील विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांनीही वंचितांना सत्तेत भागीदार बनवण्याचा निर्धार व्यक्त केला.

आगामी बिहार विधानसभेच्या पार्श्वभुमीवर पाटणा येथे काँग्रेस आणि मित्र पक्षांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी राहुल गांधी बोलत होते. राहुल गांधी यांनी सध्याच्या ५० टक्के आरक्षण मर्यादेची भिंत तोडण्याचा निर्धार व्यक्त केला. ते म्हणाले, ''प्रत्येक जातीला त्यांच्या लोकसंख्येनुसार हक्क मिळायलाच हवेत. सध्याचे सरकार याबाबत अपयशी ठरले आहे, पण आम्ही सत्तेत आलो तर हा निर्णय नक्कीच घेऊ.'' त्यांनी देशभरात ◀◀ पान २ वर

## बीड शहरात युवकाचा चाकूने भोसकून खून

बीड । प्रतिनिधी

बीड: शहरात गुरूवारी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास यश देवेंद्र ढाका (वय २२, रा. बीड) या तरुणाचा चाकूने वार करून खून करण्यात आल्याची घटना माने कॉम्प्लेक्स परिसरात घडली आहे. छातीत झालेले दोन वार आरपार गेल्याने यश ढाका रक्तबंबाळ झाला होता. जखमी अवस्थेत त्यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले, परंतु डॉक्टरांनी त्याला मयत घोषित केले. यश हा अभियांत्रिकीचे (इंजिनिअरिंगचे) शिक्षण घेत होता. वाढदिवस साजरा करताना वाद झाल्याने हा प्रकार घडल्याचे सांगण्यात आले.

बुधवारी रात्री शहरातील गजबजलेल्या माने कॉम्प्लेक्स भागात हा खून झाल्याने (पान २ वर)

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२४ सप्टेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| पीक (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- | --- |
| गहू: ६९.०० क्विंटल | २,२९१ | २,८९९ | २,५७५ |
| ज्वारी/हायब्रिड : ६६.५० क्विंटल | २,०७० | ३,१५२ | २,३६६ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,१७५ | २,१७५ | २,१७५ |
| तूर : ९.०० क्विंटल | ५,८०० | ५,८०० | ५,८०० |
| उडीद : ४९.०० क्विंटल | ३,८०० | ५,९०० | ५,१९५ |
| बाजरी: ११०.०० क्विंटल | २,२०० | ४,५०० | २,६८८ |
| मुग: १६.५० क्विंटल | ४,४०० | ७,६७१ | ५,९८६ |
| सोयाबीन: ४.०० क्विंटल | ४,२०० | ४,२०० | ४,२०० |
| हरभरा: १.५० क्विंटल | ४,९५० | ४,९५० | ४,९५० |

## थोडक्यात...

### मुस्लिमांनी अयोध्या सोडावी

अयोध्या : भाजप नेते तथा माजी खासदार विनय कटियार यांनी बुधवारी मुस्लिमांनी लवकरात लवकर अयोध्या सोडावी. या मंदिरनगरीत कोणत्याही मशिदीच्या बांधकामाला परवानगी दिली जाणार नाही असे म्हटले आहे. स्थानिक प्रशासनाने नाहरकत प्रमाणपत्र(एनओसी) नसल्याने धन्नीपूर मशिदीची योजना नाकारल्याच्या प्रश्नावर, त्यांनी हे विधान केले आहे.राम जन्मभूमी आंदोलनाशी संबंधित असलेले कटियार म्हणाले अयोध्येत बाबरी मशिदीच्या बदल्यात अन्य मशिदीच्या बांधकामाला परवानगी दिली जाणार नाही. अयोध्येत राहणाऱ्या मुस्लिमांना येथे राहण्याचा कोणताही अधिकार नाही असे ते म्हणले.

### मत चोरीवर सर्जिकल स्ट्राइक

मुंबई : लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी देशातील विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीमध्ये मत चोरी झाल्याचा गंभीर आरोप केला आहे. त्यांनी गेल्या दोन पत्रकार परिषदेत याविषयीचे पुरावे सादर केले. तर लवकरच मत चोरी प्रकरणात हायड्रोजन बॉम्ब टाकणार असल्याचा त्यांचा दावा आहे. तर त्यांच्याच पावलावर पाऊल टाकत उद्धव सेनेचे आदित्य ठाकरे हे सुद्धा मत चोरीविरोधात आवाज उठवणार आहे. आपण मत चोरीप्रकरणात सर्जिकल स्ट्राईक करणार असल्याचा इशारा त्यांनी दिला.

### खडसेंचे जावई खेवलकरांना जामीन

पुणे : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या रोहिणी खडसे यांचे पती प्रांजल खेवलकर यांना पुणे न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. २७ जुलै रोजी पुणे शहरातील खराडी परिसरातील एका सोसायटीमध्ये कथित ड्रग्स पार्टी प्रकरणी खेवलकर यांना अटक झाली होती.प्रांजल खेवलकर यांच्यासह या प्रकरणात सात जणांना अटक करण्यात आली होती. आता त्यांना पुणे न्यायालयाकडून जामीन मंजूर करण्यात आला आहे. पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेने ७ जणांना ताब्यात घेत अटक केली.

### पूरग्रस्तांच्या मदतीला लालबागचा राजा

मुंबई : राज्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने शेतक-यांचे आतोनात नुकसान झाले आहे. शेतातील पिकांसह माती आणि जनावरंही वाहून गेली आहेत. त्यामुळे, बळीराजावरील या संकटात आता माणूसकीचा आधार देण्यासाठी हात पुढे सरसावले आहेत. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तात्काळ २२१५ कोटींची मदत पूरग्रस्तांसाठी जाहीर केली असून पुढील काही दिवसांत ही मदत शेतक-यांपुढे पोहोचेल असेही त्यांनी म्हटले.

### सरकारी मेडिकल कॉलेजांत जागा वाढल्या

नवीदिल्ली : देशभरातील सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये चिकित्सा आणि शल्यचिकित्सा पदवी अभ्यासक्रमाच्या (एमबीबीएस) ५,०२३ आणि वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या पाच हजार जागा वाढविण्यास केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी मान्यता दिली. यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यामागे सुमारे दीड कोटी रुपये वाढीव खर्च येणार आहे. आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयाच्या मते यामुळे देशात आरोग्यसेवांची व्यापक आणि दर्जेदार उपलब्धता करण्यासाठी मदत मिळेल.

### प्रसाद पुरोहितांना लष्कराकडून बढती

नवी दिल्ली

देशभरात गाजलेल्या मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी एनआयएच्या कोर्टाने प्रज्ञासिंह ठाकूर यांच्यासह भारतीय लष्करातील लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित यांची नुकतीच निर्दोष मुक्तता केली होती. प्रसाद पुरोहित यांची या खटल्यातून निर्दोष मुक्तता करण्यात आल्यानंतर आता लष्कराने त्यांना पदोन्नती दिली आहे. लेफ्टिनेंट कर्नल पदावर असलेल्या प्रसाद पुरोहित यांना लष्कराने कर्नल पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. एनआयएच्या विशेष न्यायालयाने ३१ जुलै रोजी प्रसाद पुरोहित यांची मालेगाव बॉम्बस्फोट खटल्यातून निर्दोष सुटका केली होती. लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित यांनी बॉम्ब तयार करण्यासाठी काश्मीरमधून आरडीएक्स मागवले होते आणि त्यांच्याच घरी बॉम्ब तयार करण्यात आला होता.

cmyk

अग्रलेख

# लढ म्हणणे सोपे, पण बळ कोण देणार ?

आभाळ फाटलं आणि कोसळलं तर दाद कुणाकडे मागायची अश्रू सुकतात पण दु:ख सरत नाही, अशी वेळ सोलापूर लातूर, बीडसह मराठवाड्यातील बहुतेक जिह्यांवर आली आहे. नद्यांना पूर आला आता माणुसकीचा गहिवर आणि मदतीचा महापूर अपेक्षित आहे, तो पण कमी अधिक येईल पण निसर्गाचे तांडव प्रतिवर्षी वाढते आहे, ते पाप कुणाचे त्यावर इलाज काय आणि त्यावर मात कशी करायची या प्रश्नांची उत्तरे शोधायची तर सगळेच दोष आपल्याकडे येतात. आपण आपले वर्तन सुधारले पाहिजे, आपल्या दृष्टीकोनात सुधारणा केली पाहिजे आणि बदलांचा, सुधारणांचा प्रारंभ स्वत:पासून सुरू केला पाहिजे.

मराठवाड्यासह सोलापूर, अहिल्यानगर, जळगाव आणि नाशिक जिह्यात अतिवृष्टीमुळे पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. सर्वाधिक फटका मराठवाड्यातील जिह्यांना बसला आहे. सरकारने शेतकऱ्यांच्या मदतीसाठी झालेल्या पंचनाम्यानुसार २,२१५ कोटींची तातडीची मदत जाहीर केली. तसेच प्रचलित निकषांमध्ये शिथिलता आणून शेतकऱ्यांना आठ-दहा दिवसात मदत दिली जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. ढगफुटी सदृष्य पावसाने नुकसान किती झाले याची पाहणी करणे आणि शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि इतर मंत्री जणू अवघे सरकार पाण्यात उतरले आहे. प्रत्येक भागाचा आढावा, तेथील मदतकार्य, पूरात पावसात अडकलेल्या जनतेला मदत, सरकारी व सेवाभावी संस्था यांच्यात ताळमेळ, मदत संकलन, वितरण, वाटप, अशा सर्व पातळ्यांवर काम सुरु झाले आहे. या संकटात राजकारण नको, संकट परतवून लावूया, मदतीचा महापूर येऊ दे असे आवाहन मुख्यमंत्री देवाभाऊंनी केले आहे व ते आणि त्यांची टीम मैदानात उतरली आहे. मंत्री विविध जिह्यांचा दौरा करत आहेत. नुकसानीचा, मदतीचा आढावा घेतला जातो आहे. त्याच जोडीला पूरग्रस्तांना सरकार तुमच्यासोबत आहे असा विश्वास दिला जातो आहे. विरोधी नेते आणि काही राजकीय पक्ष यांनी ओला दुष्काळ जाहीर करा, अशी मागणी केली आहे पण ओला दुष्काळ अशी संकल्पना सरकारी कायद्यात नाही. अतिवृष्टीसाठी मदत अशी तरतूद आहे व त्यासाठी नियम, निकष आहेत, त्याप्रमाणे मदत करु, सरकार जनतेसोबत आहे असा विश्वास दिला गेला आहे व तोच महत्त्वाचा आहे. यंदा जूनमध्ये चांगला पाऊस होणार, असा अंदाज जाहीर झाला आणि बळीराजा आनंदला होता पण ही प्रचंड वृष्टी चांगली कशी म्हणायची, सोलापूर वगैरे भागांत गेल्या शतकातला सर्वात मोठा पाऊस कोसळत आहे. अति पावसाने सोयाबीन, उडीद, तूर, भुईमूग, मका, हळद यासह फळबागांना फटका बसला आहे. हाता तोंडाशी आलेला घास हिरावून घेणं आणि दु:खाचा डोंगर कोसळणं याची अनूभूती मराठवाडा घेतो आहे. गणपती विसर्जन झाले, पितृपंधरवडा संपला आणि नवरात्रीही सुरू झाली, तरी यंदा पावसाचा जोर कायम आहे. मुसळधार पावसामुळे मराठवाड्यात अनेक जिह्यांत पूरस्थिती निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीतच, हवामान विभागाने पुढील काही दिवसांसाठी महत्त्वाचा इशारा दिला आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, २६ ते २८ सप्टेंबर या काळात राज्यात आभाळी हवामान आणि मुसळधार पावसाची शक्यता आहे. आता या चार दिवसांत त्याने आणखी तडाखा दिला तर यंदाचा खरीप पेरा पूर्ण वाया जाणार आहे. शेतकऱ्यांना लढ म्हणणे सोप आहे पण बदललेले हवामान आणि निसर्गाचा कोप वारंवार कायम राहिला तर लढायचे कसे, जगायचे कसे, असे अनेक संकटाचे डोंगर दिसू लागतात. पण सरकार आणि माणूसकीसोबत घेऊन यातून मार्ग काढावाच लागेल.

उबाठाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी, आधी मदत द्या मग पंचनामे करा, अशी मागणी केली आहे तर शपगटाच्या नेत्या सुप्रिया सुळे यांनी, शक्तीपीठ महामार्ग रद्द करा व ते ८० हजार कोटी शेतकरी कर्जमाफीसाठी वापरा, असे म्हटले आहे. संजय राऊत यांनी गुजरातला वारंवार आणि भरघोस मदत केंद्र देते तशी ती महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना द्या, अशी मागणी केली आहे. शासन सकारात्मक दिसते आहे. संकटाचे राजकारण नको, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे पण समोर निवडणूका असताना राजकारण तर होणारच पण आभाळ फाटले तेव्हा सर्व बाजूला ठेऊन माणसांनी माणसासारखे वागले पाहिजे व हातात हात घेऊन संकटावर मात केली पाहिजे.

# शेतकऱ्यांना सरसकट मदत मिळवून देण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडे पाठपुरावा करणार -केंद्रीय मंत्री रामदास आठवले

**बीड । प्रतिनिधी**

**अतिवृष्टी व पुरामुळे बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून शेतकरी संकटाच्या गर्तेत सापडले आहेत. शेतकऱ्यांची हातची पिके, जनावरे वाहून गेल्यामुळे अनेक कुटुंबे अक्षरश: उघड्यावर पडली आहेत. या परिस्थितीत शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी मी स्वतः पुढाकार घेणार असून केंद्र व राज्य सरकारकडे सातत्याने पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही केंद्रीय समाजकल्याण मंत्री रामदास आठवले यांनी दिली.**



गुरुवार, दिनांक २५ सप्टेंबर रोजी बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आलेल्या आठवले यांनी आहेर चिंचोली येथे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांची पाहणी केली आणि त्यांच्याशी संवाद साधला.आठवले म्हणाले की, ''सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. केंद्र व राज्य सरकारकडून शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर अनुदान मिळवून देण्यासाठी मी थेट पाठपुरावा करणार आहे. शेतकऱ्यांच्या मदतीसाठी कोणतीही तडजोड केली जाणार नाही.''या पाहणी दौऱ्यात त्यांनी शेतकऱ्यांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेत त्यांच्या डोळ्यातील वेदना पाहिल्या आणि मदतीचा ठाम शब्द दिला.

या दौऱ्यात युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे, बाबुराव कदम, मिलिंद शेळके, ब्रह्मानंद चव्हाण, राजू जोगदंड,

मझर खान, किसन तांगडे, किशोर कांडेकर, अशोक साळवे, अविनाश जावळे, दिपक कांबळे,महादेव उजगरे, धोंडीराम सिरसट,दशरथ सोनवणे, रविंद्र जोगदंड, राणी गायकवाड, अरुण निकाळजे, गोवर्धन वाघमारे, लक्ष्मण सिरसट, महेश आठवले, संदीपान डोंगरे, दशरथ शिंदे, सादेक कुरेशी, बापू पवार, शाहू डोळस, गौतम बचुटे, सुभाष तांगडे, अविनाश जोगदंड, प्रभाकर चांदणे, विलास जोगदंड, सतिष सिनगारे,

प्रमोद दासूद, विलास वाघमारे, राहुल वाघमारे, शाम वीर, संभाजी गायकवाड, भाऊसाहेब दळवी, भाऊसाहेब कांबळे, नामदेव वाघमारे, यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# संकटात सापडलेल्या मराठवाड्यातील शेतकऱ्यांना भरीव मदत करा -किरण डावकर

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील मराठवाडा विभागात सध्या थैमान घातलेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. पिके उद्ध्वस्त झालेली आहेत, शेतातील माती वाहून गेली आहे, तर अनेक ठिकाणी जनावरेदेखील वाहून गेली आहेत. यामुळे शेतकऱ्यांची स्थिती अत्यंत बिकट झाली आहे.



यासंदर्भात शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सामाजिक कार्यकर्ते किरण डावकर यांनी एक प्रसिद्धी पत्रक प्रसिद्ध करून सरकारकडून तातडीने भरीव मदत जाहीर करण्याची मागणी केली आहे. डावकर यांनी म्हटले आहे की, ''राज्याच्या कणा असणारा शेतकरी आज गंभीर संकटात आहे. सरकारला या गंभीर परिस्थितीला गांभीर्याने घेत शेतकऱ्यांना मदतीचा हात देणे अत्यंत आवश्यक आहे. किरण डावकर यांनी म्हटले आहे की, ''मराठवाड्यातील प्रत्येक तालुक्यात दहा ते वीस गावं पाण्याखाली गेले आहेत. पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे आणि गुरे-मेंढ्या वाहून गेली आहेत. या आपत्तीमुळे शेतकऱ्यांचा जीवन संघर्ष आणखी गंभीर बनला आहे.''

त्यांनी सरकारकडून दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना तात्काळ कर्जमाफी आणि मदत देण्याची मागणी केली आहे. मराठवाड्यातील शेतकऱ्यांना आजची सर्वात मोठी गरज म्हणजे आर्थिक मदतीची आणि तात्काळ उपाययोजनांची आहे, असे डावकर यांनी आपल्या पत्रकात म्हटले आहे. मागील १५ दिवसांमध्ये झालेल्या पावसामुळे या भागात अत्यधिक नुकसान झाल्याने शेतकऱ्यांना आत्महत्येसाठी प्रवृत्त होण्याचा धोका निर्माण झाला आहे. यामुळे सरकारने त्वरित हस्तक्षेप करण्याची आवश्यकता आहे. या संकटामुळे शेतकऱ्यांच्या जीवनावर मोठा परिणाम होईल, याचे गंभीरतेने भान ठेवून सरकारने मदतीचा निर्णय घेतल्यास शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, अशी अपेक्षा डावकर यांनी व्यक्त केली आहे. हे संकट केवळ शेतकऱ्यांसाठीच नाही, तर राज्याच्या अर्थव्यवस्थेसाठी देखील धोक्याचे आहे. सरकारने शेतकऱ्यांच्या मदतीसाठी शर्तींच्या बाहेर पाऊल उचलले पाहिजे आणि त्यांच्या जीवनमानाची पुनर्बांधणी करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले पाहिजेत, अशी अपेक्षा सबंध समाजातून व्यक्त होत आहे.

## पान ६ वरून...

### सरवर पिंपळगावचे तात्काळ

आर्थिक मदत द्यावी. सरवर पिंपळगावसह इतर बाधित गावांचे पुनर्वसनासाठी आरक्षित जागेवर तत्काळ स्थलांतर करावे. प्रत्येक कुटुंबाला घर दुरुस्ती व जीवनावश्यक वस्तूंसाठी विशेष अनुदान द्यावे. शेतकऱ्यांना कर्जमाफी, बियाणे व खतासाठी स्वतंत्र पॅकेज जाहीर करावे. गावातील शाळा, अंगणवाडी, आरोग्य सुविधा व रस्ते दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर करावे अशी मागणी केली आहे. या अतिवृष्टी पहाणी दौऱ्यात सांगितले की, सरकारने बाधितांना केवळ आश्वासन न देता तातडीने ठोस मदत जाहीर करावी, अन्यथा आम्हाला आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागेल.

### संत -महंत व मान्यवरांच्या

व आध्यात्मिक सान्निध्य लाभणार आहे. तसेच भारत पेट्रोलियम कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपैकी अहिल्यानगर विभागाचे टेरिटरी मॅनेजर मनोज जगताप, बीडचे वरिष्ठ व्यवस्थापक नीलेश नरखेडे, सहाय्यक व्यवस्थापक अभिषेक कुमार, टेरिटरी को-ऑर्डिनेटर कीर्ती सिंघानी आणि सोलापूरचे वरिष्ठ व्यवस्थापक सचिन रावत यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या नव्या सेवा व्यवसायाच्या शुभारंभ सोहळ्याला परळी व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन''बाजीराव पेट्रोलियम''चे प्रोप्रायटर, माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी , हरिहर धर्माधिकारी, ॲड. प्रताप धर्माधिकारी आणि परिवाराने केले आहे.

### माजी मंत्री प्रा. सुरेश नवले

तालुक्यातील छोटे मोठे नदी नाले आणि प्रमुख नद्यांनी पात्र सोडल्यामुळे शेकडो एकर जमीन पूर्णपणे खरडून गेल्याने असंख्य शेतकऱ्याकडे जमीनच शिल्लक राहिली नाही ज्यांची जमीन पूर्ण खरडून गेली सकस माती राहिली नाही मातीचा पोतही बदलला पूर्ण पाण्याने वाहून गेली याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे हा महत्त्वाचा मुद्दा आहे. यासोबतच शेतमालाचे, शेती अवजाराचे, घराचे, छोट्या मोठ्या व्यावसायिकांचे, निराधार /गोरगरीबांच्या घराचे, पाळीव प्राण्याचे, पाळीव पक्षाचे आणि सार्वजनिक मालमत्तेचे अतोनात नुकसान झाले आहे. शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे माजी मंत्री प्रा. सुरेश नवले यांनी प्रतिनिधींशी बोलताना सांगितले. यावेळी शेकडो कार्यकर्त्यांसह प्रत्येक गावातील व्यवसायिक, शेतकरी, महिला, अबाल वृद्ध मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जुळ्या बंधूंनी जपले सामाजिक

झालेल्या बळीराजाला सहाय्यता म्हणून आपल्या एक दिवसाचा पगार मुख्यमंत्री सहायता निधीसाठी जमा केला. गुरुवारी आष्टी तहसीलदार वैशाली पाटील यांना त्यांनी धनादेश द्वारे ही मदत सुपूर्द केली.

### अतिवृष्टीमुळे झालेल्या

झाले काय तर शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे.हातातोंडाशी आलेल्या पिकात गुडघ्या इतके तर पाणीच पाणी असल्याने ते पिक संपुर्णपणे वाया गेले असुन यामुळे शेतकऱ्यांचे कंबरडे असुन मंडळ कृषी कार्यालय व महसूल विभागाच्या वतीने युसुफवडगांव व परिसरात मंडळ कृषी अधिकारी श्रीमती. ए.डी देरेकर,तलाठी श्रीमती वर्षा नागिले,कृषी सहाय्यक आकाश माचवे हे शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष बांधावर जाऊन पिक नुकसानीचे पंचनामे करत आहेत.

### पश्चिम महाराष्ट्र आणि

समिती सदस्य यशवंत खंडागळे यांनी केली. शिराळ नदीवरील पुल खराब झाल्याने दळणवळणाचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा या दोन प्रदेशांना जोडणारा आष्टी तालुक्यातील शिराळ नदीवरील पूल वाहुन गेला आहे. या नदीला पूर आल्याने रस्ता बंद आहे म्हणून येथील पुलाची उंची वाढण्याची काळाजी गरज आहे. आणखी पावसाळा असल्याने हा पूल वाहून जाऊन वाहतूक बंद पडणार आहे. त्यामुळे पावसाळा संपताच या फुलाची उंची वाढवून नवीन पूल करण्यात यावा अशी मागणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे जिल्हाध्यक्ष यशवंत खंडागळे यांनी आष्टीचे आमदार सुरेश धस आणि बीडचे जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

### ओला दुष्काळ जाहीर करून

तर शेतकरी उध्वस्त झाल्याशिवाय राहणार नाही त्यामुळे शेतकरी वाचला तर देश वाचन यासाठी सरकारने एक पाऊल पुढे येऊन शेतीचे पंचनामे करून ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन देऊन शिवसंग्राम शेतकरी आघाडीच्या वतीने जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे करण्यात आली. दरम्यान पालकमंत्री ना.अजित पवार यांनी शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत देण्यात येईल असे आश्वासन यावेळी निवेदनकर्त्यांना दिले.

### मंगल कार्यालयात

असल्याने नवरदेवाच्या वडिलांनी नवरीसाठी मंगळसुत्र, मिनी गंठण,नथनी, कानातले झुंबके असे ४ लाख २५ हजार रु.चे सोन्याचे दागिने आणले होते. हळदीचा कार्यक्रम सुरु होता.त्यानंतर थोड्यावेळात लग्न लागणार असल्याने आवराआवर सुरू होती. नवरदेवाच्या नातेवाईक असलेल्या महिलेच्या पर्समध्ये हे दागिने होते पण घाई गडबडीची संधीसाधून अज्ञात चोरट्यांनी या दागिन्यावर डल्ला मारल्याची घटना घडली. याप्रकरणी नवरदेवाचे वडील पाटण सांगवी येथील सुदर्शन विद्यालयाचे मुख्याध्यापक साईनाथ बोडखे यांनी आष्टी पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध सोने चोरीची तक्रार एक वर्षापुर्वी दाखल केली होती.या चोरीला एक वर्षे होऊनही अद्याप तपास नाही त्यामुळे पोलीस तपासाच्यापुढे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### ओबीसींच्या मेळाव्याला

समाजामध्ये भीती आणि सरकार विरोधात असंतोष पसरला आहे.मराठा समाज बांधवांना स्वातंत्र आरक्षण देण्याला ओबीसी समाजाचा विरोध नाही तर पाठींबा आहे. मात्र ओबीसी समाजाच्या आरक्षणावर अन्याय करणारा निर्णय महाराष्ट्र शासन घेत असल्याने या निर्णयाच्या विरोधात राज्यातील ओबीसी समाज बांधवांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे.ओबीसी आरक्षण संपुष्टात येते की काय ? या भीतीमुळे ओबीसी समाजातील नागरिक आत्महत्या सारखे शेवटचे पाऊल उचलू लागले आहेत.यामुळे ओबीसी समाजाला धीर देण्यासाठी आणि ओबीसी समाजाचे आरक्षण स्वतंत्र आणि अखंड ठेवण्यासाठी या महाएल्गार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.या मेळाव्यास ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते ना. छगनराव भुजबळ यांच्यासह ओबीसी समाजातील राज्यातील आणि राज्याबाहेरील नेते उपस्थित राहणार आहेत.या मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन महात्मा फुले समता परिषद आष्टी तालुकाध्यक्ष दत्ताभाऊ बोडखे यांनी केले आहे.

## पान १ वरून...

### मृतांच्या वारसांना ४ लाख,

जनावरांसाठी २० हजार रुपये दिले जाणार आहेत. शेळी, मेंढी, बकरे यांच्यासाठी प्रत्येकी ४ हजार रुपये, तर कुक्कुटपालन करणाऱ्यांना प्रति कोंबडी १०० रुपये (जास्तीत जास्त १० हजार रुपये) मदत मिळणार आहे. घरांच्या पडझडीसाठी झोपडीसाठी ८ हजार रुपये, पक्क्या घराच्या संपूर्ण नुकसानीसाठी १२ हजार रुपये आणि गोठ्यासाठी ३ हजार रुपये देण्याची तरतूद आहे. सांगोला तालुक्यातील चार मृत्यूंसाठी आपत्ती व्यवस्थापन विभागाने १६ लाख रुपयांची मदत पाठवली असून, त्यापैकी तीन कुटुंबांच्या बँक खात्यांत रक्कम जमा झाली आहे. चौथ्या कुटुंबाला लवकरच मदत मिळेल, अशी माहिती प्रशासनाने दिली. सांगोला तालुक्यातील माहीम येथील कासाळ ओढ्यात तन्मय रविकिरण ऐवळे (वय ७) आणि सोमनाथ विठ्ठल ऐवळे (वय १३) या दोन मुलांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला होता. या दोन्ही कुटुंबांना प्रत्येकी ४ लाख रुपयांची मदत देण्यात आली आहे. शासनाने तातडीने आर्थिक सहाय्य सुरू केल्याने पूरग्रस्तांना दुःखाच्या काळात काहीसा दिलासा मिळाला आहे. पंचनामे आणि नुकसान पाहणी दौरे जोरात सुरू असून, जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने मदत वितरणाचे आदेश देण्यात आले आहेत. पूरग्रस्त भागांतील नागरिकांनी शासनाच्या या तत्परतेचे स्वागत केले आहे.

### पीएम केअर फंडातून

यावेळी बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, अतिवृष्टीने मोठ्या प्रमाणात शेतीचे नुकसान झाले आहे. आता शेतकरी यातून कसा उभा राहील हा मोठा प्रश्न आहे, त्यासाठी शासनाने आधार आणि मदत देण्याची गरज आहे. मुख्यतः कोवीड काळामध्ये पीएम केअर स्थापन केले होते यामध्ये कोट्यावधी रुपये जमा झाले त्याचा हिशोब नाही. त्यावर मी बोलणार नाही मात्र आता यातूनच शेतकऱ्यांची कर्जमुक्ती करावी आणि हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत शेतकऱ्यांना द्यावी. कारण पीएम केअर फंडामध्ये जवळपास अडीच लाख कोटी रुपये असल्याचा अंदाज त्यांनी सांगितला. याबरोबरच त्यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावरही टीका केली. ते बोलत असताना लाडक्या बहिणींना आम्ही पैसे देतोच हेही देणार हे त्यांचे बोलणे म्हणजे सत्तेची मस्ती असल्यासारखेच आहे असेही ते म्हणाले राज्य सरकारने सोंग न करता पंतप्रधानाकडे जाऊन मदत मागावी. तीन इंजन सरकार आहे म्हणतात मग नुसता धूर काढू नका, त्यासाठी मदत मागा. दिवाळीपूर्वी मदत मिळाली नाही तर आणि कर्जमुक्तीसाठी आपण शेतकऱ्यांबरोबर रस्त्यावर उतरू, असा देखील इशारा त्यांनी राज्य सरकारला दिला आहे. जाहिरातीवर हजारो कोटीची उधळपट्टी करण्याऐवजी मायबाप शेतकऱ्यांना मदतीचा आधार द्यावा, असेही उद्धव ठाकरे शेवटी म्हणाले.

### ५० टक्के आरक्षणाची भिंत

जातिनिहाय जनगणना करण्याची गरज असल्याचेही सांगितले. अशी जनगणना झाल्यास प्रत्येक जातीला त्यांच्या लोकसंख्येचा वाटा स्पष्ट होईल आणि त्यांना त्यांचे हक्क मिळण्यास मदत होईल, असे त्यांचे म्हणणे आहे. याशिवाय, राहुल गांधी यांनी अतिमागास वर्गासाठी दहा कलमी कार्यक्रमाची घोषणा केली. हा कार्यक्रम अतिमागास वर्गातील व्यक्तींनीच तयार केला असून, त्यात त्यांच्या गरजा आणि अपेक्षा प्रतिबिंबित होतात. ''हा कार्यक्रम म्हणजे अतिमागासांचा आवाज आहे. आम्ही सत्तेत आलो तर हा कार्यक्रम प्रथम बिहारमध्ये आणि नंतर देशभरात लागू करू,'' अशी ग्वाही त्यांनी दिली. बिहार विधानसभेतील विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांनीही यावेळी आपले मत व्यक्त केले. ते म्हणाले, ''आमचे ध्येय अतिमागासांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणणे आहे. यासाठी आम्ही आमच्या संकल्पपत्रात आवश्यक त्या सुधारणा करू. सामाजिक न्यायाबरोबरच आता आर्थिक न्यायाचीही गरज आहे.'' सत्तेत आल्यास वंचित आणि मागासांना सत्तेत भागीदार बनवण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. पाटण्यात झालेली ही बैठक सुमारे साडेचार तास चालली. यात काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, राहुल गांधी यांच्यासह देशभरातील ५१ प्रतिनिधी सहभागी झाले. बैठकीत बिहार निवडणुकीसह राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विषयांवर सविस्तर चर्चा झाली. यानंतर एक राजकीय ठराव मंजूर करण्यात आला आणि बिहारच्या मतदारांसाठी विशेष आवाहन जारी करण्यात आले. विशेष म्हणजे, काँग्रेस शासित तीन राज्यांचे मुख्यमंत्रीही या बैठकीला उपस्थित होते.

### पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी

शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकल्या होत्या. त्यानंतर त्यांनी सविस्तर माहिती अजितदादांकडे सादर केली होती. त्याअनुषंगाने झालेल्या पाहणी दौऱ्यात त्यांनी शासकीय यंत्रणेला आवश्यक त्या सूचना दिल्या. तसेच, हिंगणी खुर्द गावाचे पुनर्वसन करण्यासंदर्भात चर्चा झाली असून कार्यवाही करण्याचे अजितदादांनी प्रशासनाला निर्देश दिले. यावेळी आमदार विक्रम काळे, विजयसिंह पंडित, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष ॲड.राजेश्वर चव्हाण, बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, ज्येष्ठ नेते रमेश आडसकर, युवक जिल्हाध्यक्ष बळीराम गवते, बीडचे तालुकाध्यक्ष ॲड.राजेंद्र राऊत, भाजपचे ज्येष्ठ नेते विजय पालसिंगणकर, सरपंच संतोष तांदळे यांच्यासह विविध पक्षाचे पदाधिकारी, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, पोलीस अधीक्षक नवनीत कावत, मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांच्यासह महसूल, जिल्हा परिषद, कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. पुढे बोलताना अजितदादा पवार म्हणाले की, अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. सरकार गंभीरतेने मदत करण्याच्या प्रयत्नात आहे. अद्याप कुणी आले नाही म्हणून गैरसमज करून घेऊ नका. बीड जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरीव मदत करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, अशी ग्वाही अजितदादा पवार यांनी दिली. पुरामुळे ज्या शेतकऱ्यांच्या विहिरी बुजल्या आहेत, त्यांना नव्याने योजना करून विहिरी उपलब्ध करून दिल्या जातील. ज्यांच्या घरात पाणी शिरले त्यांना थेट आर्थिक मदत व धान्याची व्यवस्था केली जाईल, असेही ते म्हणाले.

### महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य

चव्हाण यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले की, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या प्रभाग रचनेबाबत राज्य सरकारने घेतलेला हा निर्णय अन्यायकारक आहे. ज्या प्रभागांमध्ये यापूर्वी दोन वेळा आरक्षण पडले होते, तिथेच पुन्हा आरक्षण पडण्याची शक्यता आहे. यामुळे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि खुल्या प्रवर्गावरही अन्याय होत आहे. ते म्हणाले की, जेव्हा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची प्रभाग रचना आणि आरक्षण सोडत जाहीर होईल, तेव्हा हा निर्णय किती अन्यायकारक आहे हे सर्वांच्या लक्षात येईल. तसेच, निवडणूक आयोगाकडे मोठ्या प्रमाणात हरकती (आक्षेप) येतील, तेव्हा या निर्णयाची वास्तविकता समोर येईल.

### बीडमध्ये आरक्षणासाठी

बीड पोलीस ठाण्यामध्ये मृत्यूची नोंद घेण्यासाठी समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांनी तात्काळ हजर होत मदत केली. शिवाय मयताच्या कुटुंबीयांना धीर दिला. असे टोकाचे पाऊल कोणीही उचलू नये, असे आवाहन सुभाष राऊत यांनी केले. मृत्यू पूर्वी लिहलेल्या चिठ्ठीत त्यांनी भुजबळ, हाके, वाघमारे, मुंडे, धनूभाऊ तुम्ही ओबोसीसाठी लढा न्याय द्या, असे नमूद केले आहे.

### बीड शहरात युवकाचा

बीडमधील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. शहरातील नागरिक आणि गुन्हेगारांमध्ये पोलिसांचा कसलाही धाक राहिला नसल्याचे या घटनेवरून स्पष्ट होते. या घटनेनंतर आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तातडीने तपास सुरू करण्यात आला होता. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या अर्ध्या तासात सुरज आप्पासाहेब काटे (वय २१, रा. बीड) या आरोपीला बेड्या ठोकून शिवाजीनगर पोलिसांच्या स्वाधीन केले. ही कारवाई पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, उपनिरीक्षक श्रीराम खटावकर यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार अशोक दुबाले, राहुल शिंदे आणि मनोज परजणे यांनी केली.

### शेतकऱ्यांना तात्काळ मदत

असलेल्या अतिवृष्टी व ओल्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. मात्र सरकारकडून अजूनही ठोस निर्णय न घेता फक्त पंचनाम्याचे नाटक केले जात आहे. शेतकऱ्यांच्या मूलभूत मागण्यांकडे सरकारने दुर्लक्ष केल्यास मुख्यमंत्री व मंत्र्यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही, असा इशारा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जालन्यात गुरुवार दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी जालन्याचे खासदार डॉ.कल्याण काळे यांच्या संपर्क कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत बोलतानी दिला.सकाळी पैठण व अंबड तालुक्यात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची पाहणी केल्यानंतर ते बोलत होते. शेतकऱ्यांच्या जखमांवर सरकार मीठ चोळण्याचे काम करत आहे. मंत्री आणि उपमुख्यमंत्री शेतकऱ्यांच्या शेतात फक्त फोटोशेशन करण्यासाठी जातात. पंचनाम्याच्या नाटकाने शेतकऱ्यांना फसवले जात आहे. जनतेच्या दुःखावर राजकारण करणाऱ्या या सरकारचा निषेध केला पाहिजे.

राज्यातील २८८ पैकी तब्बल २४० आमदार सरकारच्या पाठीशी असतानाही शेतकऱ्यांसाठी ठोस निर्णय घेण्यात अपयशी ठरत आहे, अशी टीका सपकाळ यांनी केली. शेतकऱ्यांच्या पोटावर पाय देणारे सरकार जनतेच्या हिताचे नसल्यांही त्यांनी म्हटलं. राज्यात सरसकट ओला दुष्काळ जाहीर करावा, शेतकऱ्यांना कर्जाचा तगादा लावू नये व तत्काळ कर्जमाफी करावी, पंचनामा न करता थेट आर्थिक मदत द्यावी, शेतकऱ्यांना दसरा होण्यापूर्वी हेक्टरी ५० हजार रुपये द्यावेत, ज्यांची शेती वाहून गेली त्यांना एकरी ५ लाख रुपये नुकसानभरपाई द्यावी, पुढील काळात सरकारनेच शेतकऱ्यांना माफत बी-बियाणे आणि कीटकनाशके उपलब्ध करून द्यावीत असेही हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलंय. राज्यातील ३०० पेक्षा अधिक तालुक्यांमध्ये तिप्पट पाऊस झाला असून शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि जमीन मोठ्या प्रमाणावर वाहून गेली आहे. तरीदेखील सरकारने ओला दुष्काळ घोषित केलेला नाही. शिवाय पिकविमा योजनेतील घोटाळ्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या सरकारला जबाबदार धरले. पिकविम्याच्या नावाखाली शेतकऱ्यांची फसवणूक झाली असून आजही अनेक शेतकऱ्यांना विम्याची रक्कम मिळालेली नाही, असा दावा त्यांनी केला. याप्रसंगी खा.डॉ.कल्याण काळे,जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख, शहराध्यक्ष अतिक खान,राजेंद्र राख,कल्याण दळे, सर्व तालुकाध्यक्ष व मान्यवर उपस्थित होते.

### पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी

तुमची शेतकऱ्यांना मदत करायची नियत नाही. असा टोलाही त्यांनी लगावला आहे. अतिवृष्टीने महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये जीवितहानी झाली आहे. घरे, जनावरे, शेतजमिनी आणि खरीप-बागायती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. ही परिस्थिती हृदय पिळवटून टाकणारी आहे. अशा परिस्थितीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निर्देशानुसार, सर्व मंत्री, खासदार, आमदार, विधानपरिषद सदस्य यांनी तातडीने एक महिन्याचे मानधन मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देण्याचे ठरवले असल्याचे राष्ट्रवादीने म्हटले आहे. राज्यातील पूरग्रस्तांच्या मदतीसाठी खारीचा वाटा म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेतील प्राथमिक शाळेतील शिक्षकांनी एक दिवसाचे वेतन देण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे कळविले आहे. तर आता काँग्रेस नेते विजम वड्डेटीवार यांनी थेट सहा महिन्याचे आमदारकीचे वेतन देण्याचे जाहीर केले आहे. इतर आमदारांनीही अशी मदत करावी, असे आवाहन त्यांनी केले असून, त्यांच्या आवाहनाला किती प्रतिसाद मिळतो हे काही दिवसात दिसून येणार आहे.

cmyk

## सहकार संघाच्या वतीने विशेष वसुली अधिकारी प्रशिक्षण संपन्न

बीड /प्रतिनिधी

बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मुख्य कार्यालय राजुरी वेस बीड येथील सभागृहामध्ये महाराष्ट्र राज्य सहकार संघ मर्यादित पुणे अंतर्गत प्रशिक्षण केंद्र लातूर व उपनिबंधक सहकारी संस्था बीड यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष वसुली अधिकारी प्रशिक्षण वर्गाची सुरुवात विद्येची देवता सरस्वतीच्या प्रतिमेला बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्रा. बबनराव आंधळे सर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. यावेळी कोळी उपप्राचार्य सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर तसेच बोडके अकोला व सर्व प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून लाभलेले एस एम. तोटावार जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीड, ए. एस. कदम सहाय्यक निबंधक सहकारी संस्था बीड, जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँक चे मुख्य कार्यकारी अधिकारी व वसुली अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तज्ञ व्याख्याते आर एस बोडखे अकोला यांनी मुद्देसूद रित्या मार्गदर्शन केले तसेच सहकार प्रशिक्षण केंद्र लातूरचे उपप्राचार्य एस आर कोळे यांनी प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शुक्रवार दि.२६ सप्टेंबर २०२५



# पुरग्रस्तांच्या मदतीसाठी सचिन मुळूक धावले

## सांस्कृतीक कार्यक्रम रद्द करत निधी जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपूर्द करणार

बीड। प्रतिनिधी

नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या वतीने लाडक्या बहिणींसाठी विविध सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. मात्र गेल्या काही दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांचे हातचे पिके वाहून गेली, घरांची पडझड झाली आणि जनजीवन विस्कळीत झाले. या गंभीर परिस्थितीची दखल घेत शिवसेनेने सामाजिक बांधिलकी जपत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. लाडक्या बहिणींसाठी आयोजित सर्व स्पर्धा रद्द करून त्यावर होणारा खर्च थेट शेतकऱ्यांच्या मदतीसाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे जमा करण्यात येणार असल्याचे शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी सांगितले.



नवरात्रात लाडक्या बहिणींना स्वतःची कला आणि कौशल्य मांडण्याची संधी मिळावी या हेतूने २४ ते २९ सप्टेंबर दरम्यान स्वयंभू नारायणी रांगोळी स्पर्धा, स्त्रीशक्ती मेहंदी स्पर्धा आणि नवरंग नृत्य रील स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धांना महिलांकडून चांगला प्रतिसाद मिळणार अशी अपेक्षा होती. परंतु अचानक झालेल्या अतिवृष्टीमुळे मराठवाड्यासह बीड जिल्ह्यात शेतकरी मोठ्या संकटात सापडले. शेतात पाणी साचल्याने कापूस, सोयाबीन, ज्वारीसारखी प्रमुख पिके नष्ट झाली असून शेतकरी आर्थिकदृष्ट्या हवालदिल झाले आहेत. अनेकांचे संसार उघड्यावर पडले आहेत. या दुःखद परिस्थितीत सण-उत्सव साजरा करण्याऐवजी शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे ही खरी सामाजिक बांधिलकी आहे. त्यामुळे स्पर्धा रद्द करून त्यासाठीचा निधी मदतीसाठी देण्यात येणार आहे. दरम्यान शिवसेना नेहमीच संकट काळात शेतकऱ्यांच्या सोबत उभी राहिली आहे. नवरात्रात महिलांसाठी आनंदाचा माहोल निर्माण करण्याची इच्छा होती; मात्र सध्या शेतकऱ्यांचे अश्रू पुसणे महत्वाचे आहे. यामुळे स्पर्धा रद्द करून सर्व निधी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शेतकऱ्यांच्या मदतीसाठी देण्यात येणार आहे. शिवसेना पक्षाचे मुख्य नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे कायम गांभीर्याने पाहतात. त्यांचे मार्गदर्शन आणि नेतृत्व लक्षात घेऊन जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे जिल्हाप्रमुख सचिन मुळूक म्हणाले.

## गंगामसला येथे पूरग्रस्तांसाठी दोन दिवस जेवणाची सोय

माजलगाव। प्रतिनिधी

तालुक्यातील सुरूमगांव येथील २५० पूरग्रस्त नागरिकांना गंगामसला येथे स्थलांतरित करण्यात आले, आपत्तीजनक, अडचणीच्या परिस्थितीत पुरग्रस्त परिस्थितीतील नागरिकांची सतीषराव सोळंके यांनी व्यक्तीगत दोन दिवस जेवणाची व्यवस्था केली असून याबद्दल त्यांचा माजलगांव उपविभागीय दंडाधिकारी गौरव इंगोले यांनी सत्कार करून त्यांचे आभार मानले.

परिसरात झालेली जोरदार अतिशय अतिवृष्टी झाली होती, गोदावरी नदीला पुर आल्याने काठावरील बऱ्याच गावात पाणी शिरले होते, यामुळे त्यांना आपले गाव सोडावे लागले होते. अशा ऐनवेळी उद्भवलेल्या संकटामुळे, कुठल्याही प्रकारचे जिवनोपयोगी साहित्य सोबत घेता आले नाही, फक्त सरळ घराबाहेर पडावे लागले, सुरूमगांव येथील २५० पूरग्रस्तांची गंगामसला येथील मोरेश्वर




महाविद्यालय राहण्याची व्यवस्था केली होती. संकटकाळी दोन दिवस त्यांच्या जेवणाची व्यवस्था सतीषराव सोळंके यांनी केली तर शुद्ध पाण्याची व्यवस्था मोठेवाडी ग्रामपंचायतीच्या वतीने करण्यात आली होती. सतीषराव सोळंके यांच्या या कार्याबद्दल माजलगाव उपविभागीय दंडाधिकारी गौरव इंगोले यांनी त्यांचा सत्कार करून त्यांचे आभार मानले. यावेळी शेकपचे भाई अड. नारायण गोले,तलाठी रूपचंद आभारे उपस्थित होते.

## पन्नास वर्षांनी पुन्हा एकत्र आल्या गीता प्रशालेच्या कन्या

बीड/प्रतिनिधी

तब्बल अर्धशतकानंतर विनायक (गीता) कन्या प्रशालेच्या परिसरात जुने दिवस पुन्हा उजळले. माजी विद्यार्थीनीं स्वाती देवच्या पुढाकारातून आयोजित या स्नेहसंमेलनात शालेय जीवनाच्या जुन्या गोड आठवणींना मिळाला उजाळा. माजी विद्यार्थिनी स्वाती देव हिच्या कल्पनेने बहरले विनायक प्रशालेचे आंगण. जुन्या मैत्रिणींचा मेळावा, गुरुजनांचा सत्कार आणि त्याला आठवणींचा भावनिक आधार, यामुळे संपूर्ण वातावरणच जणू भावूक झाले होते. तब्बल अर्ध शतकानंतर पुन्हा भेटलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर बाल मैत्रीचे किस्से आणि डोळ्यांत आनंदाश्रू , गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारे ते क्षण खरंच अविस्मरणीय होते.अशा भावनिक वातावरणात झालेले स्नेहसंमेलन सर्वांसाठी संस्मरणीय ठरले.

या मेळाव्यात माजी तसेच कार्यरत शिक्षक कर्मचारी यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यामध्ये आदर्श माजी मुख्याध्यापिका शहापुरे मॅडम, वझे मॅडम, श्रीमती कुलकर्णी, हुबेकर मॅडम, आगळे मॅडम, आगळे सर, माजी कला शिक्षक सोनवणे सर, दोडके सर यांच्यासह कार्यरत असलेले मु.अ. पेशकार सर, गवते सर, सिरसट सर, श्रीमती

देशमुख, श्रीमती विभा जोशी, श्रीमती शेख, श्रीमती वडमारे, देवमाने सर, पाटोळे सर, लिपिक शिंदे, कर्मचारी शिंदे व काळे मामा यांचा सन्मान करण्यात आला.

स्नेहसंमेलनात माजी विद्यार्थीनी स्वाती देव, विजया कुरुलकर, वसुंधरा मोरलवार, बेबी जोशी, उर्मिला बोरा व सरस्वती सवई यांनी मनोगत व्यक्त करत, शालेय जीवनातील गोड आठवणी देखील उजागर केल्या. कार्यक्रमात शाळेची विद्यार्थिनी कु. विशाखा आगळे हिला उत्कृष्ट बाल चित्रकार म्हणून सन्मानित करून हजार रुपयांचे बक्षीस मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले. तसेच तत्कालीन शिक्षक चव्हाण सर, माने सर, वाय.डी. क्षीरसागर सर, काकडे सर, आढाव सर, श्रीमती उटगे मॅडम व श्रीमती यमपुरे मॅडम यांच्या कार्याचा देखील गौरव करण्यात आला.

## गणेश बजगुडे शेतकऱ्यांच्या बांधावर

बीड /प्रतिनिधी

बीड तालुक्यासह जिल्हाभरात परतीच्या पावसाने प्रचंड धुमाकुळ घातलेला असताना सरकार मात्र पंचनाम्याच्या नावावर वेळ काढू पना करत असुन सर्वच शेतकऱ्यांचे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. शेतकरी अतिशय हवालदिल झालेला असताना त्यांना आधार देण्यासाठी काँग्रेस नेते गणेश दादा बजगुडे पाटील हे शेतकऱ्यांच्या पाठीशी उभा राहून



शेतकऱ्यांना तत्काळ सरसकट हेक्टरी पन्नास हजार रुपये मदत आठ दिवसात देण्यात यावे नसता काँग्रेस पक्ष आणि शिवक्रांती संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा गणेश दादा बजगुडे पाटील यांनी दिला आहे. काल बीड तालुक्यातील अनेक नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना भेटी देऊन त्यांच्या पाठीशी खासदार रजनीताई पाटील परिवार व काँग्रेस पक्ष खंबीरपने उभे असुन नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांन कसल्याही प्रकारची अडचण आल्यास किंवा मदत लागल्यास आमच्याशी संपर्क करावा असे ही ते म्हणाले.

## महाराणी ताराबाई विद्यालयाचा सुरज घुगे द्वितीय

### संचालक इंजि.अशोक आंधळे यांच्या हस्ते सत्कार

वडवणी। प्रतिनिधी

जिल्हा क्रीडा अधिकारी बीड यांच्या वतीने बुधवार दि.२४ सप्टेंबर २०२५ रोजी शिवछत्रपती क्रीडा संकुलन बीड या ठिकाणी संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय शालेय कुस्ती क्रीडा स्पर्धेत वडवणी येथील, महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील इयत्ता- ११ वी विज्ञान शाखेचा विद्यार्थी चि.सुरज घुगे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला.

बीड जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेमध्ये १७ वर्ष वयोगटातील ६० किलो वजनी गटात चि. सुरज सुधाकर घुगे या शालेय मल्लांनी बीड,शिरूर-कासार आणि धारूर तालुक्यातील शालेय मल्लासोबतची कुस्ती जिंकून अंतिम फेरीमध्ये प्रवेश केला होता त्यांचा शालेय कुस्ती क्रीडा स्पर्धेत जिल्ह्यातून द्वितीय क्रमांक आला त्यानी महाराणी ताराबाई शाळेचे नाव



जिल्ह्यामध्ये रोशन केले त्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणारे क्रीडा शिक्षक निवरकर सर यांचे या यशाबद्दल संस्कार शिक्षण मंडळाचे संस्थापक सचिव माजी आमदार केशवराव आंधळे व विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष तथा भाजपा युवा मोर्चा बीड जिल्हाध्यक्ष संजय आंधळे, वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रणजीत भैय्या धस यांनी अभिनंदन केले तसेच विद्यालयाच्या वतीने संस्थेचे प्रतिनिधी तथा संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे यांच्या हस्ते शाल,श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती शोभाताई आंधळे-डोईफोडे मॅडम,उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर,हिंदी विषयाचे जेष्ठ अध्यापक डोईफोडे सर,श्री.सुनीलजी कुलकर्णी सर,श्री.प्रदीपजी काळे सर,प्रा.मुंडे सी.व्ही.,प्रा.अंडील जी.पी.,प्रा. संजयजी केदार सर यांच्यासह विद्यालयातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांनी विज्ञानाचा आधार घेत केले वेगवेगळे प्रयोग सादर



परळी वैजनाथ

नाथ शिक्षण संस्था संचलित शारदा विद्या मंदिर माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी विज्ञानाचा आधार घेऊन, विज्ञानाचे वेगवेगळे प्रयोग सादर केले .विद्यार्थ्यांना विज्ञान विषयाची आवड निर्माण करण्यासाठी नाथ शिक्षण संस्था संचलित शारदा विद्या मंदिर माध्यमिक विभागाच्या वतीने विज्ञानाचे वेगवेगळे प्रयोग सादर करण्या करिता शाळेचे विज्ञान विभाग प्रमुख एस.बी.राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली विज्ञानाचा आधार घेऊन वेगवेगळे प्रयोगाचे आयोजन करण्यात आले होते. या मध्ये

विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून पवनचक्की, विद्युत घंटा, सौर ऊर्जेचे प्लांट या सारखे वेगवेगळे प्रयोग सादर करत आपण सुद्धा जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी सक्षम आहोत असे दाखवून दिले.शारदा विद्या मंदिर माध्यमिक विभागाच्या वतीने आयोजित हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## अटल लॅब शिक्षकांचे प्रशिक्षण

### जिल्ह्यातील १९ शाळेतील ६० शिक्षक सहभागी

अंबाजोगाई। प्रतिनिधी

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अंबाजोगाई आणि लेन्ड अ टॅन्ड इंडिया पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने इलेक्ट्रॉनिक्स युगात विद्याध्यांना नवनवीन तंत्रज्ञ शिक्षकांसाठी दि १९ सप्टेंबर रोजी अंबाजोगाई येथील न्यु व्हिजन पब्लिक स्कूल येथे अटल लॅबचे प्रशिक्षण घेण्यात आले. या प्रशिक्षणासाठी जिल्यातील १९ शाळेतील ६० शिक्षक सहभागी झाले होते . सदरिल प्रशिक्षण हे सहा महीने चालणार असून दर महिन्याला तीन दिवस हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. आजच्या या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन अंबाजोगाई डायटच्या अधिव्याख्याता डॉ. सुलक्षणा पवार, शाळेचे प्राचार्य एम. प्रशांतकुमार, अटल लॅब प्रमुख शहुल जगताप, विषयतज्ञ रामदास लोमटे, श्रीमती मिनाक्षी आटकुलवार,अमोल स्वामी, सुनील वाघमारे हे उपस्थित होते. या प्रशिक्षणासाठी अंबाजोगाई, धारूर,



परळी, माजलगाव, वडवणी या पाच तालुक्यातील अटल लॅब असलेल्या १९ शाळेतील ६० शिक्षक सहभागी झाले होते.

शाळेतील विद्यार्थ्यांना इलेक्ट्रॉनिक्स विषयक माहिती मिळण्याच्या उद्देशाने, अटल लॅब उभारण्यात आली असून यासाठीच्या प्रशिक्षण माध्यमातून विद्यार्थ्यांना कोडींग, रोबोटिक्स, थ्री-डी प्रिंटर, ड्रोन टेक्नॉलॉजी या विषयाची माहिती मिळणार आहे. या प्रशिक्षणामुळे शिक्षकांचे तांत्रिक ज्ञान समृद्ध होऊन ते विद्यार्थ्यांपर्यंत पोहचेल आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही आधुनिक तंत्रज्ञानाची गोडी लागून नवनविन शोध घेण्याची प्रेरणा मिळेल असा विश्वास प्रमुख पाहुण्या डॉ. सुलक्षणा पवार यांनी व्यक्त केला. या उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य एम. प्रशांतकुमार यांनी केले. तर उपस्थित सर्वांचे आभार प्रशिक्षणार्थी शिक्षक राहुल जगताप यांनी व्यक्त केले.

## रामकथेच्या श्रवणाने जीवनातील व्यथा दूर होते -ढोक महाराज

### श्री.योगेश्वरी देवीच्या मंदिरात रामकथेचे आयोजन

अंबाजोगाई। प्रतिनिधी

रामकथेच्या श्रावणाने जीवनातील व्यथा दूर होतात. प्रत्येक प्रश्नांचे उत्तर राम कथेतून मिळते. असे प्रतिपादन रामायणाचार्य ह.भ.प.रामराव ढोक महाराज यांनी केले . येथील श्री.योगेश्वरी देवीच्या नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने २४ नोव्हेंबर ते २९ नोव्हेंबर सोमवार पर्यंत दररोज सायंकाळी ७ ते रात्री १० या वेळेत रामायणाचार्य रामराव ढोक महाराज यांच्या रामकथेस बुधवारी प्रारंभ झाला.

यावेळी उपस्थित भक्तांना संबोधित करताना ढोक महाराज म्हणाले की,आपल्या देशात एकही असा माणूस नाही.ज्याला रामायण माहित नाही. समाजात असलेली आदर्श जीवनमूल्ये रामायणाच्या माध्यमातूनच समाजात संक्रमित झाली आहेत. एक आदर्श राजनीती,जीवन पद्धती सांगणारा ग्रंथ म्हणून रामायणाकडे पाहिले जाते. पुढे बोलताना ढोक महाराज म्हणाले की देशात अखंडता टिकवायची असेल तर महाराष्ट्रात अखंडता पाहिजे. महाराष्ट्रातली ऐकी टिकविण्यासाठी आपल्या जिल्ह्यात ऐकी पाहिजे. जिल्ह्यात एकी टिकविण्यासाठी तालुक्यात एकी पाहिजे. तालुक्यातील एकी टिकविण्यासाठी आधी गावात एकता पाहिजे.गावातली ऐकी टिकविण्यासाठी आधी आपल्या कुटुंबात एकता पाहिजे. कुटुंबातली ऐकी टिकवण्यासाठी बंधूंचं बंधूवर प्रेम असल पाहिजे.ते प्रेम कसं असावं यासाठीच रामायण ऐकलं पाहिजे. असे अनेक संदर्भ देत त्यांनी उपस्थितांना रामायणातील अनेक प्रसंग सांगितले. प्रारंभी रामायणाची पूजा देवल कमिटीच्या विश्वस्तांनी केली.महाआरती राजकिशोर मोदी यांनी केली. ढोक महाराज यांचे स्वागत देवल कमिटीचे सचिव गिरधारीलाल भराडिया,उत्सव प्रमुख उल्हास पांडे, भगवानराव शिंदे,सौ.पूजा राम कुलकर्णी, सौ.गौरी जोशी, शिरीष पांडे, श्रीराम देशपांडे यांनी केले.रामकथा ऐकण्यासाठी महिला व भाविकांची मोठी गर्दी झाली होती.

जाहिर प्रगटन

**तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं.४३१/२०२५**
**प्रदिप चंद्रकांत मुळे विरुद्ध**
**ग्रामपंचायत कार्यालय नेकनूर**

पहा
प्रदिप चंद्रकांत मुळे रा. नेकनूर ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्ममृत्यु नोंद दावा प्रकरण विधिज्ञ मार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म प्रदिप चंद्रकांत मुळे यांचा दिनांक १६/०६/१९९१ रोजी जन्म झालेला असून त्यांचे जन्माची नोंद जन्ममृत्यू नोंदवही मध्ये घेण्याबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरू आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की. सदरहून येस जन्माची नोंद ग्रामपंचायत कार्यालय /न.प कार्यालयस नेकनूर ता. बीड येथील जन्म मृत्यू रजिस्टरला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदर होऊन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे नेकनूर ता. जि. बीड येथील जन्ममृत्यू रजिस्टर ला घेऊन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनाक /२०२५ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख २०२५ ही आहे

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

**सनद हरवली आहे**

दिनांक २२ सप्टेंबर २०२५ रोजी बीड ते आहेरवडगाव प्रवास करताना श्वेता किशन रांजवन या नावाची एस.एस.सी. ची सनद हरवली आहे. सापडल्यास कृपया खालील पत्त्यावर आणून द्यावी.

**संपर्क पत्ता**
**श्वेता किसन रांजवण**
**मोबाईल**
**न.९१५८११३९५४**

**टीसी हरवला आहे**

श्यामसुंदर जगन्नाथ जाधव यांचा बी.ए.पासचा टी सी वडवणी बीड प्रवासादरम्यान हरवला आहे. तरी सापडल्यास संपर्क साधावा.

**संपर्क**
**९१ ९४२१३ ५१२८३**

## महाएल्गार मेळाव्यास वडवणी तालुक्यातून हजारो ओबीसी बांधव उपस्थित राहणार- आंधळे

वडवणी / प्रतिनिधी

ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी ना. छगनराव भुजबळ यांच्या उपस्थितीत दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी संपन्न होणाऱ्या ओबीसी महाएल्गार मेळाव्यास केज तालुक्यातून हजारो ओबीसी बांधव उपस्थित राहणार असल्याची ग्वाही पिंपळा येथील सरपंच केशव आंधळे यांनी दिली आहे.

महाएल्गार मेळाव्याच्या पूर्व नियोजनासाठी आज गुरुवार दि. २५ सप्टेंबर रोजी वडवणी तालुक्यातील ओबीसी बांधवांची बैठक संपन्न झाली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस अॅड. सुभाष राऊत यांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलताना सरपंच केशव आंधळे म्हणाले की, रविवार दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी ४ : ०० वाजता बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील छत्रपती संभाजी महाराज क्रीडा संकुलाच्या प्रांगणात ओबीसी



समाजाचे राष्ट्रीय नेते तथा कॅबिनेट मंत्री ना. छगनराव भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत हा महाएल्गार मेळावा होणार असून याप्रसंगी जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री तथा राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे, माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर, धनगर समाजाचे नेते प्रकाश शेंडगे, आ. गोपीचंद पडळकर, मुस्लिम समाजाचे नेते शब्बीर अन्सारी, ज्येष्ठ साहित्यिक तथा भटक्या विमुक्त समाजाचे नेते लक्ष्मणराव गायकवाड, वंजारी समाजाचे नेते सत्संग मुंडे आदींची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

बीड जिल्ह्यातून लाखो ओबीसी बांधव या मेळाव्यास उपस्थित राहणार आहेत. वडवणी तालुक्यातून देखील हजारो ओबीसी समाज बांधव या मेळाव्यास उपस्थित राहतील अशी ग्वाही पिंपळा येथील सरपंच केशव आंधळे यांनी दिली. या बैठकीस भास्कर मुंडे (उपसरपंच कोठरबंन), दिनेश नाईकवाडे (सरपंच साळिंबा), गणेश चोले (शालेय समिती अध्यक्ष खडकी), बजरंग शिंदे, किसन यादव (चेअरमन मामला), महादेव ढगे (माजी सरपंच साळींबा), विष्णू शिंदे (मेंबर परभणी के.), पत्रकार महेश सदरे, अमोल आंधळे पिंपळा, किशोर चाटे, रामधन नागरगोजे, सुशील मुंडे, बन्सी लेडाळ, रमेश ढगे, गोविंद शिंदे, सावता शिंदे, संतोष रासवे, नारायण नाईकनवरे, अशोक घुगे, आदेश नांदुरकर, पप्पू ढोले (नगरसेवक वडवणी), अजय राऊत, बालाजी शिंदे, ऋषिकेश ढगे, रामभाऊ शिंदे, सुग्रीव शिंदे, विशाल शिंदे, संजय नाईकनवरे, बाबुराव ससवदे, कृष्णा लांब, रमेश शिंदे, महादेव नागरगोजे, अजित शिंदे, चद्रकात शिंदे, मच्छिंद्र शिंदे, गणेश धायतीडक, यांच्यासह वडवणी तालुक्यातील ओबीसी संघटनांचे पदाधिकारी, समाज बांधव आणि समता सैनिक आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. आभार समता परिषदेचे तालुकाध्यक्ष कृष्णा शिंदे यांनी मानले.

cmyk

# नोकरीला सोडून मुलगी बनली लाखोंचा नफा कमावणारी उद्योजिका

## शेतीतील नवदुर्गा मयुरी काळे यांची यशोगाथा!

मूळच्या निफाड तालुक्यातील सोनगाव येथील मयुरी नितीन काळे या सुरुवातीपासूनच अभ्यासात हुशार होत्या. त्यांनी बी.ई. इलेक्ट्रॉनिक्सचे शिक्षण पूर्ण केले आणि आपल्या करिअरची दमदार सुरुवात केली. लग्नानंतर त्यांनी काही काळ नोकरी केली, मात्र मुलीच्या जन्मानंतर कुटुंबाला अधिक वेळ देण्यासाठी त्यांना नोकरी सोडावी लागली. पण मयुरी स्वस्थ बसल्या नाहीत. त्यांनी इलेक्ट्रिक व्हेइकल डिझाईनचा कोर्स केला आणि त्यांना वार्षिक पाच लाख रुपयांचे पॅकेज असलेली चांगली नोकरी मिळाली. पण ती नोकरी स्वीकारायची झाल्यास कुटुंबापासून दूर पुण्यात राहावे लागणार होते. कुटुंबाची घडी विस्कटणार, या विचाराने जड अंत:करणाने त्यांनी ती संधी सोडली.

हा निर्णय त्यांच्यासाठी सोपा नव्हता, पण कुटुंबाच्या आनंदासाठी त्यांनी हा त्याग स्वीकारला. नेमक्या त्याच काळात, त्यांच्या पतीने एक प्रस्ताव मांडला. नाशिकच्या () कॉलेज रोडवरील 'ज्यूस फार्मच्या' फ्रँचायजीची जबाबदारी तू स्वीकारशील का, असे त्यांनी विचारले. व्यवसायाचा कोणताही अनुभव नसलेल्या मयुरींनी ''एकदा करून पाहू'' या सकारात्मक विचाराने हे आव्हान स्वीकारले.



फेब्रुवारी २०२४ मध्ये त्यांनी ज्यूस फार्म चालवायला घेतला. त्यांच्या मदतीसाठी पती होते, पण ज्यूस फार्म घेतल्याच्या दुसऱ्याच दिवशी त्यांना कंपनीच्या कामानिमित्त इराणला जावे लागले. त्यामुळे सर्व धावपळ मयुरी यांना एकट्यालाच करावी लागली. त्या रात्री अकरा वाजेपर्यंत ज्यूस फार्म चालवायच्या. घर आणि ज्यूस सेंटर अशा दुहेरी जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीपणे पेलल्या. सर्वात महत्वाचे म्हणजे आपण जर योग्य नियोजन केले तर कुटुंब सांभाळून आपण व्यवसायाचीही जबाबदारी पेलू शकतो हे त्यांना समजले.

मयूरी यांनी अत्यंत कमी वेळेत कामाचे नियोजन करणे, ग्राहकांना समजून घेणे आणि व्यवसायातील बारकावे आत्मसात केले. सुरुवातीला एका हेल्परच्या मदतीने त्या नव्या जोमाने कामाला लागल्या. मयुरी यांनी व्यवसायातला नफा वाढविण्यासाठी दोन गोष्टींवर भर दिला, त्यात पहिली, त्यांनी ज्यूस बनवण्याच्या पद्धतीत अचूकता आणली. दुसरी त्यांनी ग्राहकांशी थेट संवाद साधायला सुरुवात केली. त्या ग्राहकांना ज्यूस किती आरोग्यदायी आहे हे समजावून सांगू लागल्या. त्यांच्या सेवेत सुधारणा झाल्याने एकदा जोडलेला ग्राहक पुन्हा पुन्हा त्यांच्याकडे येऊ लागला व त्यांच्या व्यवसायात वाढ होऊ लागली. मयुरी यांच्या या प्रयत्नांना लवकरच यश आले.

ऑगस्ट २०२४ पासून ज्यूस फार्मच्या नफ्यात वाढ व्हायला सुरवात झाली. आज या फार्ममधून दरमहा जवळपास ८० हजार रुपये निव्वळ नफा मिळतो. सुरुवातीला नोकरीची संधी गमावल्याची खंत वाटणाऱ्या या २८ वर्षांच्या युवा उद्योजिकेला आता आपल्या निर्णयाचा अभिमान वाटतो. त्या म्हणतात, ''मी व्यवसाय सुरू केला याचा मला अभिमान आहे. आणि माझ्या सारखी कोणतीही महिला हे करू शकते.'' आज त्यांच्याकडे दोन माणसे कामाला आहेत आणि त्यांचा व्यवसाय व्यवस्थित स्थिर झाला आहे.आता त्या केवळ ज्यूस फार्मच सांभाळत नाहीत, तर वेळेचे योग्य नियोजन करून त्यांनी 'किचन कल्चर'च्या आउटलेटमध्ये भागीदारी करून नव्या व्यवसायातही पाऊल ठेवले आहे. एका व्यवसायात यश मिळाल्यावर लगेच दुसऱ्या संधीकडे लक्ष देण्याची त्यांची वृत्ती त्यांच्या महत्वाकांक्षेचे प्रतीक आहे. ''संधी आली की सोडायची नाही'' हे त्यांचे ब्रीद वाक्य बनले आहे. उच्चशिक्षित महिला, युवतींना कमी भांडवलात चांगला उद्योग उभारून,शेतकरी आणि ग्राहक यातील दरी कमी करून, दर्जेदार पदार्थ ग्राहकांना पुरविण्याचे काम या माध्यमातून केल्याचे समाधान मिळत असल्याचे मयूरी सांगतात . मयुरी यांनी हे सिद्ध केले आहे की, कुटुंबाला प्राधान्य देतही प्रत्येक स्त्री आपल्या कौशल्यांचा वापर करून एक यशस्वी उद्योजिका होऊ शकते.

# शेतकऱ्यांनो, अशाप्रकारे ओळखा अस्सल डीएपी खत



खत खरेदी करताना शेतकऱ्यांना बरेचदा फसवणुकीचे अनुभव येतात. शेतकऱ्यांना खत म्हणून बरेचदा माती सुद्धा विकली जाते. यामुळे त्यांचे कष्टाचे पैसे वाया तर जातातच शिवाय पिकांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान होते. बाजारात बनावट खते मिळत असल्याने शेतकऱ्यांना नुकसानीची चिंता असते. यासाठी अस्सल डीएपी खत ओळखण्याच्या काही उत्तम पद्धतींची माहिती असणे गरजेचे आहे.

अस्सल डीएपी खताची ओळख खालीलप्रमाणे करा : मूळ डीएपी खते दाणेदार असतात आणि दाणे कडक असतात. डीएपी खताच्या दाण्यांचा रंग तपकिरी, काळा आणि बदामासारखा दिसतो. मूळ डीएपी खत नखांनी तोडणे फार कठीण आहे. अस्सल डीएपी खताला तीव्र गंध असतो. त्यामुळे दुकानातून डीएपी खत खरेदी करताना ते खत हातात कुस्करून घ्या आणि नंतर त्याचा वास घ्या. डीएपी खताचे दाणे गरम केल्यावर ते फुगतात.

डीएपी खत खरेदी करताना या गोष्टी लक्षात ठेवा : खत खरेदी करताना शेतकर्याने विक्रेत्याकडून वैध पावती घ्यावी. जेणेकरून फसवणूक झाल्यास बनावट खताबाबत तक्रार करता येईल. नेहमी खते, आणि बियाणे नोंदणीकृत दुकानातूनच खरेदी करावे. मशिनमधून खत घेतानाही, तुम्हाला कन्फर्म पावती घ्यावी लागेल. यासाठी तुम्हाला अंगठ्याच्या ठशाची पावती मिळेल.

डीएपी खताची किंमत किती आहे? : भारतीय बाजारपेठेत डीएपी खताची किंमत प्रति बॅग १,३५० रुपयांपर्यंत आहे. ही किंमत राज्यानुसार बदलू शकते. त्याचप्रमाणे म्युरेट ऑफ फॉस्फेट (एमओपी) खताच्या एका पिशवीची बाजारात किंमत १,६७० रुपयांपर्यंत आहे. याशिवाय नायट्रोजन, फॉस्फरस आणि पोटॅशियमच्या एनपीके खताच्या एका पोत्याची किंमत सुमारे १,४७० रुपये आहे.

# टोमॅटो पिकातील 'स्क्लेरोशिया मर रोग'



टॉमॅटो पिकामध्ये मुख्यत: साऊथर्ण मर रोग, फुझॅरियम मर, लवकर येणारा करपा, उशिरा येणारा करपा आणि जिवाणूजन्य करपा या महत्त्वाचे रोगांचा प्रादुर्भाव दिसून येतो. या बरोबरच सध्या जिवाणूजन्य मर रोगाचा प्रादुर्भाव बऱ्याच भागांत दिसून येत आहे. टोमॅटो पिकातील स्क्लेरोशिया मर रोग या रोगाचा प्रादुर्भाव मुख्यतः खोडावर, फळांवर आणि फांद्यांवर दिसून येतो. प्रादुर्भावामुळे पाने, फांद्या सुकतात. त्यामुळे पिकाचे मोठे नुकसान होते.

रोगाची माहिती : रोग निर्माण करणाऱ्या बुरशीचे शास्त्रीय नाव : १) जुने नाव : स्क्लेरोशियम रोलफ्सी, २) नवीन नाव : ॲग्रोअथेलिया रोलफ्सी. हा रोग बुरशीच्या प्रादुर्भावामुळे होतो. या रोगामुळे पिकाचे ५ ते ६० टक्क्यांपर्यंत नुकसान होऊ शकते. भाजीपाला, फळपिके, फुले, तेलधान्यवर्गीय पिकांवर येतो. उदा. मिरची, टरबूज, खरबूज, सोयाबीन, बीट, भेंडी इत्यादी.

रोग कसा निर्माण होतो : या रोगाचा प्रसार हा स्क्लेरोशिया व बुरशीच्या तंतूपासून होतो. हे दोन्ही जमिनीत आणि आधीच्या पीक अवशेषांवर अनेक वर्षे जिवंत राहतात. साधारण २५ ते ३५ अंश सेल्सिअस तापमान व ९० टक्के आर्द्रता, ओलसर जमीन या रोगास अनुकूल असते. अशा वातावरणात रोगकारक बिजाणू व तंतूपासून रोगाची लागण होते. त्यानंतर ३ ते ५ दिवसांत खोडावर लक्षणे दिसून येतात. रोगाचा प्रसार : बुरशीचे तंतू आणि स्क्लेरोशिया असलेली माती एका ठिकाणाहून दुसरीकडे गेली, किंवा वाहते पाणी, जोराचे वारे, शेती अवजारे यांना रोगाचे तंतू आणि स्क्लेरोशिया चिटकून दुसरीकडे गेल्यानंतर रोगाचा प्रसार होतो.

लक्षणे : रोगाची लक्षणे प्रामुख्याने खोडावर दिसतात. खोडावर जमिनीलगत काळसर ते तपकिरी डाग दिसून येतात. तो भाग आतमध्ये गेल्याप्रमाणे दिसतो. त्या भागावर पांढरट रंगाच्या बुरशीची वाढ दिसू लागते. बहुतांश वेळा प्रादुर्भावामुळे खोडाला मुळे फुटलेली दिसतात. त्यावर पांढरट वाढ दिसून येते. या बुरशीच्या वाढीवर गोलाकार मण्यांसारखी वाढ दिसून लागते. यालाच स्क्लेरोशिया असे म्हणतात. हे स्क्लेरोशिया सुरुवातीला पांढरे व नंतर काळपट तपकिरी होतात. या रोगामुळे झाडाची पाने सुकू लागतात. झाड लवकर वाळून जाते. त्यानंतर अशीच लक्षणे फळांवर देखील दिसतात. आणि फळे गळून जातात. रोगाचे स्क्लेरोशिया पाहण्यासाठी सूक्ष्मदर्शकाची गरज पडत नाही. उघड्या डोळ्यांनी आपण पांढरे किंवा तपकिरी स्क्लेरोशिया पाहू शकतो. पांढऱ्या बुरशीच्या आवरणावर हे स्क्लेरोशिया लहान मणी पडल्याप्रमाणे दिसतात, किंवा मोहरीच्या दाण्याने प्रमाणे दिसतात.

नियंत्रणाचे उपाय : पीक फेरपालट करावी. आधीचे पीक या रोगास बळी पडणारे नसावे. लागवडीपूर्वी बीजप्रक्रिया अवश्य करावी. जास्त पाऊस असताना लागवड करणे टाळावे. जमिनीचा सामू ॲसिडीक नसावा. रोगग्रस्त झाडे काढून जाळून त्वरीत नष्ट करावीत. जमिनीवर ट्रायकोडर्मा व्हिरीडी या जैविक बुरशीनाशकाची फवारणी तसेच आळवणी करावी. नियंत्रणासाठी शिफारस केलेल्या बुरशीनाशकांचा तज्ज्ञांच्या सल्ल्याने वापर करावा. शिफारस केलेली बुरशीनाशके : कॅप्टन (७५ डब्ल्यूएस), मेटॅलॅक्झिल अधिक मॅन्कोझेब (३१.८ टक्के ईएस), थायोफेनेट मिथिल (७० टक्के डब्ल्यूपी)

# उसाच्या लागवडीसाठी सेंद्रिय कर्बाचे महत्त्व अधिक



केंद्र शासनाने प्रकाशित केलेल्या २०१५ च्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे अपेक्षित मूल्यमापनाबाबत निर्देशांकाची माहिती गेल्या काही भागात घेत आहोत. कारण केंद्र असो की राज्य शासन, आपल्या कोणत्या योजना आखतेवेळी त्यात काही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवत असते. त्याप्रमाणेच एकात्मिक व्यवस्थापन कार्यक्रमांची उद्दिष्टेदेखील शाश्वत विकासाच्या संकल्पनांशी निगडित अशी मांडलेली होती. त्यात नैसर्गिक साधनसंपत्तीच्या विकासाबरोबर लहान आणि अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांच्या विकासाचा विचार प्रकर्षाने केला होता.

भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने सन २०२२-२३ या वर्षी प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार, एकात्मिक व्यवस्थापन कार्यक्रम टप्पा क्रमांक एक व प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना या माध्यमातून ३१ मार्च २०२२ अखेर देशातील एकूण ८,२१४ पाणलोट क्षेत्रांची निवड केली होती. पहिल्या टप्प्यामध्ये २००९-१० ते २०१४ -१५ या वर्षांपर्यंत २८ राज्ये व २ केंद्रशासित प्रदेशातील ३९.०७ दशलक्ष हेक्टर क्षेत्रावर पाणलोट संबंधी उपचार केले. त्यासाठी सुमारे ३३,६४२ कोटी रुपये खर्च केंद्र शासनाने केले. (एकूण खर्च केलेली रक्कम रु. ५०,७३९.५८ कोटी रुपये असून, त्यात केंद्र व राज्याच्या खर्चाची विभागणी ६०:४० टक्के या प्रमाणात आहे. पूर्वांचल व डोंगरी भागासाठी हे प्रमाण ९०: १० असे आहे). सुरुवातीपासून म्हणजेच २००९-१० पासून केंद्र शासनाने १९,९२७ कोटी रुपयांचा हिस्सा राज्यांना दिला आहे. उपचारासाठी निवडलेल्या एकूण पाणलोटांपैकी ६३०० पाणलोट पूर्णत्वास गेल्याचे राज्य सरकारांनी भूमी संसाधन विभागाला कळविले आहे.

सन २०१४ -१५ ते सन २०२१-२२ यादरम्यान प्राप्त माहितीनुसार उपचारीत पाणलोट क्षेत्रांमध्ये ७.६५ लाख इतके उपचार (सिमेंट / माती नाला बांध, नाला खोलीकरण, बांधबंधिस्ती, शेततळी, सलग समतल चर इ.) करण्यात आले आहेत, तर काही जुने उपचार पुनरुज्जीवित करण्यात आले आहेत. या प्रयत्नांमुळे झालेले बदल अहवालामध्ये नोंदवले आहेत. ते असे -

देशातील १६.४१ लाख हेक्टर क्षेत्र संरक्षित सिंचनाखाली आले असून, त्याचा फायदा ३६.३४ लाख शेतकऱ्यांना झाला. या कार्यक्रमांचे अंतरिम संनियंत्रण व मूल्यमापन अहवाल प्राप्त झाले आहेत. याशिवाय उपचारीत क्षेत्राचे १६.७५ लाख फोटो अक्षांश रेखांश सहित घेतल्याचेदेखील नमूद केले आहे. या मूल्यमापनामध्ये यामध्ये भौतिक व गुणात्मक स्तरावर पडताळणी केल्याबाबतचे नमूद केले आहे. केंद्र सरकारने हेच प्रकल्प पुढे दुसऱ्या टप्प्यांमध्ये राबविताना २०२१-२२ व २०२५-२६ या वर्षांपर्यंत आणखी ४.९५ दशलक्ष हेक्टर क्षेत्र व त्यासाठी केंद्र शासनाचा वाटा म्हणून रुपये ८१३४ कोटी मंजूर केले आहेत. या दुसऱ्या टप्प्यांमध्ये ३१ डिसेंबर २०२२ पर्यंत २८० राज्यांमधील व २ केंद्रशासित प्रदेशामध्ये १११० क्षेत्रामध्ये पाणलोटाचे उपचार केले. केंद्र शासनाने वरील नमूद क्षेत्रांसाठी रु. १५६८.३८ कोटी हा निधीही राज्यांना वितरित केल्याचे नमूद केले आहे. वरील नमूद प्रकल्पांच्या अंतरिम मूल्यमापनामध्ये कोणत्या घटकांच्या आधारे मूल्यमापन करावे, या संदर्भात केंद्र शासनानेच २०१५ मध्ये मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. या सूचनांनुसार अंतरिम मूल्यमापन होणे गरजेचे आहे. गेल्या भागापासून आपण शेती आणि फळबागांवर झालेल्या परिणामांची माहिती घेत आहोत. त्याबाबत पुढील ११ ते १५ क्रमांकाचे निर्देशांक तक्त्यामध्ये मांडले आहेत. भारतातील कृषी हवामानाशी निगडित प्रदेशांमध्ये उपचारीत पाणलोट क्षेत्रांमध्ये अपेक्षित बदल नोंदवतानाच निवडलेल्या प्रत्येक पाणलोटातील किमान २०० शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणे आणि पाणलोट संदर्भात यशस्वी गावांना भेटी देण्यासाठी अभ्यास सहल किंवा क्षेत्रभेटीसंदर्भात सूचवले होते. त्यातील काही घटकातील बदल नोंदविण्यासाठी दर तीन आणि पाच वर्षांनी सर्वेक्षण घेऊन मूल्यमापनाचे अहवाल पाणलोट विकास पथक, तज्ज्ञ समिती, मूल्यमापन व संनियंत्रण यंत्रणांनी सादर करावेत असे सुचवले होते. म्हणजेच प्रत्यक्ष सर्वेक्षणातून पाणलोटातून झालेल्या गावकऱ्यामध्ये झालेल्या बदलांची खरी आकडेवारी मिळाली असती. याशिवाय वाढलेले यांत्रिकीकरण, साधनसंपत्ती संवर्धन, पीक पद्धतीतील बदल, उत्पादकतेमध्ये झालेली वाढ याबाबत प्रदेशनिहाय अपेक्षित बदल तक्त्यामध्ये दिलेले आहेत. २०१५ च्या मार्गदर्शक सूचनांमध्ये भौतिक, गुणात्मक पद्धती बरोबर संख्यात्मक पद्धतीने मूल्यमापन व्हावे असे नमूद केले आहे.

मात्र ग्रामीण विकास मंत्रालयाच्या अहवालामध्ये अंतिम मूल्यमापनामध्ये फक्त भौतिक व गुणात्मक पद्धतीने अहवाल प्राप्त झाल्याचे म्हटले आहे. त्यात संख्यात्मक बाबींचा उल्लेखही दिसत नाही. त्यामुळे उपरोक्त नमूद निर्देशांकाबाबत संनियंत्रण व मूल्यमापन यंत्रणांनी नेमके कोणत्या आधारावरती मूल्यमापन केले आहे याबाबत संदिग्धता आहे.

# दिन विशेष

### महत्वाच्या घटना

४६ : ज्युलियस सीझर यांनी आपल्या पौराणिक पूर्वज व्हिनस गेनेटिक्स यांना एक मंदिर अर्पण केले.
१७७७ : अमेरिकन क्रांती ब्रिटिश सैनिक फिलाडेल्फिया शहरात घुसले.
१९०५ : अल्बर्ट आइनस्टाइन यांनी सापेक्षतावादाचा विशेष सिद्धांतावरील पहिला लेख प्रकाशित केला.
१९१० : त्रावणकोर सरकारवर केलेल्या टीकेमुळे भारतीय पत्रकार स्वदेशभीमानी रामकृष्ण पिल्लई यांना अटक करून हद्दपार करण्यात आले.
१९५० : इंडोनेशियाचा संयुक्त राष्ट्रात प्रवेश
१९५४ : जपानमध्ये तोया मारू ही फेरी वादळात बुडाली. १,१७२ लोक मृत्युमुखी.
१९६० : फिडेल कॅस्ट्रोने यु. एस. एस. आर. ला पाठिंबा जाहीर केला.
१९७३ : ध्वनीपेक्षा अधिक वेगाने जाणार्या 'काँकॉर्ड' या विमानाने अटलांटिक महासागर न थांबता विक्रमी वेळात पार केला.
१९८४ : युनायटेड किंगडमने हाँगकाँगच्या हस्तांतरणास मान्यता दिली.
१९९० : रंगनाथ मिश्रा यांनी भारताचे २१ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९७ : गरुडा इंडोनेशियाचे विमान मेदान शहराजवळ कोसळले, २३४ लोक ठार.
२००१ : सकाळ वृत्तपत्राचे व्यवस्थापकीय संपादक संचालक प्रताप पवार यांची इंडियन न्यूजपेपर सोसायटीच्या अध्यक्षपदी निवड.
२००९ : टायफून केत्साना या चक्रीवादळाच्या तडाख्यात फिलिपाईन्स, चीन, व्हिएतनाम, कंबोडिया, लाओस व थायलंडमध्ये ७०० लोक मृत्युमुखी.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८२० : इश्वरचन्द्र विद्यासागर बंगाली समाजसुधारक, तत्त्वज्ञ, लेखक, शिक्षणतज्ञ व उद्योजक. यांच्या प्रयत्नांमुळेच १८५६ मधे विधवा विवाहाचा कायदा आला. (मृत्यू: २९ जुलै १८९१)
१८४९ : इव्हान पेट्रोव्हिच पाव्हलॉव्ह चयापचय प्रक्रियेविषयी महत्त्वाचे संशोधन करणारे नोबेल पारितोषिक विजेते (१९०४) रशियन शास्त्रज्ञ (मृत्यू: २७ फेब्रुवारी १९३६)
१८५८ : मणिलाल नथुभाई त्रिवेदी गुजराथी साहित्याच्या पंडितयुगातील एक अष्टपैलू लेखक, आर्यसंस्कृतीचे व शंकराचार्यप्रणित अद्वैत वेदांताचे कडवे पुरस्कर्ते (मृत्यू: १० आक्टोबर १८९८)
१८७० : डेन्मार्कचा राजा क्रिस्चियन (दहावा) यांचा जन्म.
१८७६ : भारतीय कवी, वकील, आणि राजकारणी गुलाम कबीर नैयरंग यांचा जन्म. (मृत्यू: १६ ऑक्टोबर १८५२)
१८८८ : टी. एस. इलियट अमेरिकेत जन्मलेले ब्रिटिश कवी, नाटककार, टीकाकार आणि नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: ४ जानेवारी १९६५)
१८९४ : आचार्य शंकर दत्तात्रेय जावडेकर लेखक व गांधीवादी तत्त्वचिंतक (मृत्यू: १० डिसेंबर १९५५)
१९०९ : नासकार चे संस्थापक बिल फ्रान्स सीनियर यांचा जन्म. (मृत्यू: ७ जून १९९२)
१९१८ : मिस वर्ल्ड चे संस्थापक एरिक मॉर्ली यांचा जन्म. (मृत्यू: ९ नोव्हेंबर २०००)
१९२३ : देव आनंद चित्रपट अभिनेता व निर्माता (मृत्यू: ३ डिसेंबर २०११)
१९२७ : गेटोरेडे चे सह-संशोधक रॉबर्ट कड यांचा जन्म. (मृत्यू: २७ नोव्हेंबर २००७)
१९३१ : विजय मांजरेकर क्रिकेटपटू (मृत्यू: १८ आक्टोबर १९८३)
१९३२ : डॉ. मनमोहन सिंग भारताचे १३ वे पंतप्रधान, अर्थतज्ञ?
१९४३ : इयान चॅपेल ऑस्ट्रेलियाचा क्रिकेट कप्तान
१९७२ : न्यू झीलँडचा क्रिकेट खेळाडू मार्क हॅस्लाम यांचा जन्म.
१९८१ : सेरेना विल्यम्स अमेरिकन लॉन टेनिस खेळाडू

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०२ : लेव्ही स्ट्रॉस अमेरिकन उद्योजक (जन्म: २६ फेब्रुवारी १८२९)
१९५२ : स्पॅनिश तत्त्वज्ञानी जॉर्ज सांतायाना यांचे निधन.
१९५६ : लक्ष्मणराव किर्लोस्कर किर्लोस्कर उद्योगसमुहाचे संस्थापक (जन्म: २० जून १८६९)
१९७७ : उदय शंकर जागतिक कीर्तीचे नर्तक व नृत्यदिग्दर्शक, पद्मविभूषण (१९७१), संगीत नाटक अकादमी पुरस्कार (१९६२) व फेलोशिप विजेते. त्यांनी अल्मोडा येथे 'इंडिया कल्चरल सेंटर'ची स्थापना केली. (जन्म: ८ डिसेंबर १९००)
१९८८ : पण्डित शिवरामबुवा दिवेकर हिन्दगंधर्व (जन्म: १ एप्रिल १९१२)
१९८९ : हेमंतकुमार गायक, संगीतकार आणि निर्माता (जन्म: १६ जून १९२०)
१९९६ : विद्याधर गोखले नाटककार व संपादक (जन्म: ४ जानेवारी १९२४)
२००२ : राम फाटक गायक व संगीतकार (जन्म: २१ आक्टोबर १९१७)
२००८ : पॉल न्यूमन अभिनेता, दिग्दर्शक व रेस कार ड्रायव्हर (जन्म: २६ जानेवारी १९२५)
२०२० : इशर जज अहलुवालिय भारतीय अर्थशास्त्र (जन्म: १ ऑक्टोबर १९४५)

# उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडू नका-आ. शशिकांत शिंदे

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यात अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. सारं शिवार जलमय झालं. बीड जिल्ह्याची परिस्थिती अत्यंत बिकट आहे. हाता तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिसकावला. घरदार, पिकासह शेत जमीन वाहून गेली. पशुधनाचे नुकसान झाले. संपूर्ण खरीप गेलं रब्बीची शाश्वती राहिली नाही. कर्जात अडकलेल्या शेतकऱ्यांचे संसार उध्वस्त झाले. भयावह परिस्थिती असताना काल शासनाने जाहीर केलेली तुटपुंजी मदत शेतकऱ्यांचे आर्थिक संकट सावरू शकत नाही. सरसकट पंचनामे करण्याचे आदेश देणे आवश्यक असताना परिस्थिती पाहून पंचनामे करा असे आदेश शासनाने दिले आहेत. ही संकष्टग्रस्त शेतकऱ्यांची फसवणूक आहे. हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि भरीव आर्थिक मदतीची गरज आहे. शासनाने दिलदार मनाने ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना भरभरून मदत करावी. अन्यथा सर्वसामान्य शेतकरी उठाव करेल, नाशिक प्रमाणे बीडमध्ये सुद्धा शरदचंद्र पवार साहेब यांच्या उपस्थितीत महामोर्चा काढून जाब विचारला जाईल असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे यांनी



दिला आहे.

आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश अध्यक्ष मा. आ. शशिकांत शिंदे यांनी बीड जिल्ह्यातील नुकसानीची पाहणी करण्यासाठी बीड जिल्हा दौऱ्यावर आले होते. जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या नियोजनातून दौरा संपन्न झाला. खा. बजरंग बप्पा सोनवणे, आ. संदीप भैय्या क्षीरसागर, जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के, माजी आमदार सलीम भाई , अँड उषाताई दराडे, संगिता ताई ठोंबरे, मेहबूब शेख,अँड हेमाताई पिंपळे,सुशीलाताई मोराळे, आदी सह प्रमुख पदाधिकारी सकाळपासून या दौऱ्यात सहभागी होते. पिंपळवाडी, दत्तनगर, बेलखंडी, नागझरी, शिरापूर गात, निमंगाव चांदेवली ब्रम्हनाथ येळंब, शिरूर का. येथील व्यापारी व आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांची संवाद साधून त्यांच्या अडचणी व समस्या जाणून घेतल्या. पिंपळवाडी ता बीड येथील पूरग्रस्त पीडित मयत आदित्य कळसाने यांच्या कुटुंबाची व पप्पा येतील मयत अक्षय जाधव यांच्या कुटुंबाची भेट घेऊन सांत्वन केले. शिरूर कासार शहरामध्ये सिंदफणाचे पाणी घुसल्याने अनेक व्यापाऱ्यांचे दुकान व नागरिकांचे संसार वाहून गेले. राज्यकर्त्यांनी अद्याप या पूरग्रस्त पीडित कुटुंबांची दखल घेतली नाही. राष्ट्रवादी काँग्रेसच्या या पाहणी दौऱ्यामुळे पीडित कुटुंबांना दिलासा मिळाला. बीड जिल्ह्यातील पूर परिस्थितीमुळे रस्ते फुल शाळा दवाखाने इमारती यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. लाईट आता विद्युत व्यवस्था कोलमडले असून ट्रांसफार्मर पोल तारीख याचे नुकसान झाले आहे. सर्व क्षतिग्रस्त मूलभूत सुविधांचे पाहणी करून या सर्व मूलभूत सुविधा पुन्हा उभा करण्यासाठी शासनाने विशेष निधीची तरतूद करावी. शेतकरी बांधवांचे प्रचंड नुकसान झाले असून या अस्मानी संकटातून शेतकऱ्यांना सक्षमपणे उभे करण्यासाठी ओला दुष्काळ जाहीर करावा,सरसकट कर्जमाफी देऊन शेतकऱ्याचा सातबारा कोरा करावा, हेक्टरी ५० हजाराची मदत देण्यात यावी, वाहून गेलेली शेत जमीन पूर्ववत करण्यासाठी विशेष अनुदान देण्यात यावे,घर, गायगोठे,सौर ऊर्जा यंत्र विद्युत मोटारी, यांचे पंचनामे करून अनुदान देण्यात यावे, पाण्यात बुडालेल्या तसेच वाहून गेलेल्या विहिरींना विशेष अनुदान देण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने शासनाकडे केली आहे. शेतकऱ्यांच्या वेदनांकडे शासन लक्ष देत नसल्याचे चित्र समोर आल्याने प्रचंड आक्रोश शेतकरी बांधवांमध्ये आहे. सत्ताधाऱ्यांनी निवडणुकीपूर्वी दिलेल्या वचनाप्रमाणे शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करावा ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना आधार द्यावा. राज्य सरकार व ठोस पाऊल उचलत नसेल तर सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या बरोबर राष्ट्रवादी काँग्रेस खांद्याला खांदा देऊन उभी राहणार आहे. नाशिक प्रमाणे बीडमध्ये सुद्धा पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांच्या उपस्थितीत बीडमध्ये महामोर्चा काढला जाईल. अशी माहिती यावेळी आमदार शशिकांत शिंदे यांनी दिले आहे. बीड जिल्ह्यात पूर परिस्थितीमुळे ज्यांचे संसार वाहून गेले अशा कुटुंबांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने लवकरच संसार उपयोगी वस्तू आणि सामग्रीचे वितरण करण्यात येणार आहे.अशी माहिती जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली आहे

## थोडक्यात




### प्रदेश उपाध्यक्षपदी विजयराज बंब यांची निवड

मुंबई। प्रतिनिधी

अखिल भारतीय जैन अल्पसंख्याक महासंघाच्या महाराष्ट्र राज्य प्रदेश उपाध्यक्षपदी समाजरत्न विजयराजजी बंब यांची निवड करण्यात आली आहे. अखिल भारतीय जैन अल्पसंख्याक महासंघाच्या नूतन पदाधिकाऱ्यांचा पदग्रहण सोहळा मंगळवारी मुंबई येथील बाबासाहेब डहाणूकर सभागृह, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स ऑरीकॉन हाऊस, फोर्ट मुंबई येथे पार पडला. जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष राज्यमंत्री ललितजी गांधी, राज्याचे कौशल्य विकास मंत्री ना. मंगलप्रभातजी लोढा, राष्ट्रीय महामंत्री संदीप भंडारी यांच्यासह महासंघाच्या अनेक मान्यवरांची यावेळी उपस्थिती होती. यावेळी जैन अल्पसंख्याक महासंघाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी बीड येथील दैनिक लोकाशाचे संपादक, समाजरत्न विजयराजजी बंब यांची निवड करण्यात आली. महासंघाने दिलेली जबाबदारी आपण यशस्वीरित्या पार पाडू, असे विजयराजजी बंब यांनी सांगितले. विजयराज बंब यांच्या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### जिल्हास्तरीय लोकशाही दिन ०६ ऑक्टोबर रोजी

बीड। प्रतिनिधी

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार दि. ०६ आक्टोंबर २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले आहे. अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा. तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी, अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसीलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती, दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल, असे जिल्हाधिकारी कार्यालयाने कळवले आहे.

### एकात्म मानव दर्शन म्हणजे शरीर मन बुद्धीचा विकास -डॉ.मोराळे

बीड। प्रतिनिधी

भारतीय राजकारण आणि समाजकारणावर प्रभाव पाडणारे पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी एकात्म मानव दर्शन ही संकल्पना मांडली. ही संकल्पना समाजाच्या साठी प्रेरणादायी आणि दिशादर्शक आहे असे प्रतिपादन सावरकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी केले. स्वा. सावरकर महाविद्यालयात



पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे जयंती व एकात्म मानव दर्शन हिरक महोत्सवी वर्ष साजरी करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे, डॉ. आबासाहेब राठोड, प्रा. राजपाल जाधव,डॉ. गंगाधर उषमवार यांची उपस्थिती होती.पुढे बोलताना मोराळे म्हणाले की, पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी मांडलेल्या 'एकात्म मानव दर्शन' ही केवळ संकल्पना नाही तर मानवी जीवनाकडे पाहण्याचा एक समग्र दृष्टिकोन आहे, जो व्यक्ती, समाज, राष्ट्र आणि जगाला एकत्रित बांधतो. पंडित जींचा असा विश्वास होता की मानवी जीवनाचे ध्येय केवळ भौतिक सुखापुरते मर्यादित नसावे,तर ते शरीर, मन, बुद्धी आणि आत्म्याच्या संतुलित विकासा सोबत समाजातील शेवटच्या व्यक्तीचे कल्याण साधण्याकडे असावे, ज्याला आपण अंत्योदय म्हणतो. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. राजपाल जाधव, प्रा. राम गव्हाणे, प्रा. दीपा देशपांडे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.शेंडगे यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, कर्मचारी, प्राध्यापक, यांची उपस्थिती होती.

## जामखेड तालुक्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्यावतीने जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

जामखेड

अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्याला अवकाळी पावसाचा व नदी-नाल्यांना आलेल्या पुराचा मोठा तडाखा बसला आहे. सलग पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे शेतामध्ये तसेच घरांमध्ये पाणी घुसल्याने नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे. यामध्ये घरातील सर्व जीवन उपयोगी साहित्यांचे नुकसान झाले आहे त्यातच अनेक गावांचा संपर्क तुटला असून जनजीवन विस्कळीत झाले आहे. पूरामुळे अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले. घरांमध्ये पाणी शिरल्याने अन्नधान्य, कपडे व घरगुती साहित्य वाहून गेले आहे. आणि जे साहित्य राहिले ते निरुपयोगी आहे.

जनावरांचे मोठे नुकसान झाले असून शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांनाही फटका बसला आहे. या गंभीर परिस्थितीत नागरिकांना मदतीचा हात मिळणे ही काळाची गरज बनली आहे.यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पुढे सरसावला. संघाच्या स्वयंसेवकांनी पूरग्रस्त भागात धाव घेतली व नागरिकांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले.

फूड पॅकेट्स, किराणा साहित्य, ब्लँकेट्स, कपडे आदी वस्तूंचे वाटप करून पूरग्रस्त कुटुंबांना दिलासा देण्यात आला.ही मदत जामखेड तालुक्यातील दिघोळ, रत्नापूर, सोनेगाव, धनेगाव तसेच खर्डा या गावांमध्ये पोहोचवण्यात आली. पूराच्या पाण्यात अडकलेल्या व अत्यावस्थेत असलेल्या नागरिकांपर्यंत स्वयंसेवकांनी पोहोचून त्यांना आवश्यक वस्तू दिल्या.स्थानिक नागरिकांनी सांगितले की, ''प्रत्येक नैसर्गिक आपत्तीच्या काळात संघाचे स्वयंसेवक आदेशाची वाट न पाहता स्वयंस्फूर्तीने मदतीला धावून येतात. हीच संघ विचाराची ताकद आहे.'' पूरग्रस्त भागात केलेल्या या सेवाभावपूर्ण कार्याचे जिल्ह्यातून तसेच तालुक्यातून मोठ्या प्रमाणावर कौतुक होत आहे. अनेक सामाजिक संस्था व नागरिकांनीही या कार्याचे स्वागत केले असून पुढील काळात अशा मदतीची अधिक गरज असल्याचे मत व्यक्त केले आहे.

## खा. कल्याण काळे यांनी काढला चिखलातून मार्ग आणि साधला शेतकऱ्यांशी संवाद

जालना। प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालंय. या पार्श्वभूमीवर जालना लोकसभेचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी बुधवार दि. २४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळ पासून बदनापूर व अंबड आणि जालना तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त भागाची पाहणी केली. शेतकऱ्यांच्या बांधावर जाण्यासाठी खा. डॉ. कल्याण काळे यांना चिखल तुडवित मार्ग काढावा लागला. अखेर शेतकऱ्यांच्या नुकसानग्रस्त शेतीमध्ये जावून काळे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला.

बदनापूर तालुक्यातील तळणी, वाकूळणी तसेच अंबड तालुक्यातील मठ जळगाव, बनटाकळी आणि जालना तालुक्यातील गोलापांगरी यासह विविध गावातील शेतात आणि परिसरात जावून त्यांनी प्रत्यक्ष शेतकऱ्यांची व्यथा जाणून घेतली. पिकांचे मोठ्या प्रमाणावर झालेले नुकसान पाहता तात्काळ पंचनामा करून शेतकऱ्यांना त्वरित मदत मिळावी, अशा सूचना महसूल विभागाला डॉ. काळे यांनी दिल्या. या पाहणीवेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, राजेंद्र राख,बदनापूर तालुका अध्यक्ष लक्ष्मण म्हसलेकर, जयप्रकाश चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेसचे राम सिरसाठ, भानुदास घुगे, कल्याण तारडे, दिनेश काकडे, बप्पासाहेब डोखळे, हनुमान धांडे, रामेश्वर फंड, जयसिंग राजपुत, सुभाष काटकर, विनायक आबा कोळकर, सुदाम काळे, तुकाराम संत, बंडु पागिरे,कृष्णा पाटील पडुळ, सोपान तिरूखे, माऊली इंगोले तसेच शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तालुक्यात अतिवृष्टीने मोठे नुकसान; तात्काळ पंचनामे करा-दानवे

जालना। प्रतिनिधी

जालना तालुक्यात मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संकटात आले आहेत. या अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले असून रस्ते, पूल आणि शेतीसाठी महत्त्वाचे मार्ग वाहून गेले आहेत. तसेच काही भागात मुक्या जनावरांचीही जीवित हानी झाली आहे.



भाजपा जालना महानगराचे जिल्हाध्यक्ष भास्करराव पाटील दानवे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पत्राद्वारे तात्काळ मदत देण्याची मागणी केली आहे. पत्रामध्ये त्यांनी सांगितले आहे की, तालुक्यातील प्रत्येक मंडळातील अधिकारी व कर्मचारी यांनी आपल्या स्तरावर तात्काळ पंचनामे करावे. तसेच, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासन स्तरावर योग्य ती मदत मिळावी व त्यांना दिलासा दिला जावा. अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान जास्त वेळ न गवसता लवकरात लवकर भरून काढले पाहिजे. शासन आणि संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरित पंचनामे करावेत, या अतिवृष्टीमुळे तालुक्यातील अनेक गावांमध्ये पिकांचे नुकसान मोठ्या प्रमाणावर झाले आहे.यावेळी तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, विष्णू बापू डोंगरे, विजय मोहिते, गोवर्धन कोल्हे, नागेश अंभोरे, राजाराम जाधव, माऊली उगले, विलास मोहिते, यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.



जालना : कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सचिव पदावर भरतराव तनपूरे यांची नियुक्ती झाल्याबद्दल भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला. यावेळी तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, नागेश अंभोरे, रमेश दानवे, माऊली उगले, राजाराम जाधव, संजय जाधव, हार्दिक फलके, प्रसाद काकडे, गणेश गजर तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## ट्विंक्लिंग स्टार शाळेकडे जाणारा पूल झाला धोकादायक

### विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका; तात्काळ नवीन उंच पूल बांधा



बीड । प्रतिनिधी

शहरापासून लांब असलेल्या ट्विंक्लिंग स्टार शाळेकडे जाणारा पूल अत्यंत धोकादायक स्थितीत आल्याने विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. या पुलाची अवस्था पाहता येथे तात्काळ नवीन उंच पूल बांधण्याची गरज आहे. यामुळे संबंधित शासकीय-प्रशासकीय यंत्रणेने येथे लवकरात लवकर नवीन पुलाचे निर्माण करावे अशी मागणी मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केली आहे.

बीड शहरापासून लांब असलेल्या उत्तम नगर परिसरा पुढे कर्परा नदीच्या पलीकडे ट्विंक्लिंग स्टार स्कूल या शाळेकडे जाणारा कर्परा नदीवरील पूल अत्यंत धोकादायक स्थितीत आला आहे. पुलावरील रस्त्याचा काही भाग पाण्यात वाहून गेला असून मुख्य पुलाचा रस्ता जागोजागी खचला आहे. मोठमोठ्या भेगा पडल्यामुळे तसेच सध्या जोरदार पाऊस पडत असल्याने कर्परा नदीला आतापर्यंत अनेकदा पूर आलेले आहेत. पुलावरून सातत्याने पुराचे पाणी वाहत असल्याने हा पूल कधीही कोसळू शकतो. ट्विंक्लिंग स्टार शाळेकडे जाणारा हा एकमेव मार्ग असल्याने विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्या शाळेच्या मोठ्या जड गाड्या याच पुलावरून ये-जा करतात. जर कधी पुलावरून शाळेची गाडी जात असताना हा पूल कोसळला तर मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांच्या जीवितास मोठ्या प्रमाणात धोका आहे. ही बाब लक्षात घेता हा पूल ज्यांच्या अखत्यारीत आहे मग ते जिल्हा प्रशासन, बीड नगर परिषद किंवा ग्रामपंचायत कोणीही असो संबंधित शासकीय-प्रशासकीय यंत्रणेने तांत्रिक बाबी जलद गतीने हाताळून ट्विंक्लिंग स्टार शाळेकडे जाणाऱ्या या पुलाच्या जागी नवीन उंच पुलाचे निर्माण करावे अशी मागणी मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी केली आहे.

# नुकसान झालेले तलाव रस्ते तातडीने दुरुस्त करा -पालकमंत्री

बीड । प्रतिनिधी

: जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या तलाव, बंधारे, रस्ते आणि पुलांच्या तातडीने दुरुस्तीचे निर्देश उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजितदादा पवार यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत. यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी गुरुवारी (दि.२५) निवेदन सादर केले होते. या निवेदनाची तात्काळ दखल घेत पालकमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना जागेवरच सूचना दिल्या.



निवेदनात म्हटले की, जिल्ह्यात २०० हून अधिक मध्यम व लघुप्रकल्प असून, त्यांची डागडुजी करणे अत्यंत आवश्यक आहे. अतिवृष्टीच्या परिस्थितीत पूराचा गंभीर धोका निर्माण होऊ शकतो, त्यामुळे प्रकल्पांच्या सांडव्यांची दुरुस्ती व इतर कामांचा आढावा घेऊन त्वरित उपाययोजना व्हाव्यात. मुसळधार पावसामुळे अनेक रस्ते व पूल वाहून गेले असून, त्यांची तातडीने दुरुस्ती आवश्यक आहे. काही गावांमध्ये वीजेचे खांब कोसळून तारा तुटल्या असल्याने वीजपुरवठा खंडित झाला आहे. त्यामुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेऊन संबंधित विभागांनी दुरुस्तीची कामे हाती घ्यावीत. तसेच, सततच्या पावसामुळे बीड शहरातील डांबरी रस्ते पूर्णपणे खराब झाले असून, त्यांच्या दुरुस्तीची आवश्यकता आहे. याशिवाय, बीड तालुक्यातील पिंपळवाडी गावाजवळील बिंदुसरा नदीचे खोलीकरण व रुंदीकरण करून संरक्षणभिंत उभारावी आणि नदीवर कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा बांधण्याची गरज असल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

सलग १३, १४, १५, १६ तसेच २१ व २२ सप्टेंबर रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील दररोजची सरासरी पर्जन्यमानाची टक्केवारी सुमारे ५० टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. शासनाच्या निकषानुसार अतिवृष्टी नोंदवण्यासाठी ६५ टक्के सरासरी पर्जन्यमान आवश्यक आहे. मात्र, पावसाच्या सलग सत्रामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असल्याने या पार्श्वभूमीवर निकषात बदल करून अतिवृष्टीच्याच उपाययोजना कराव्यात, अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे.

# चुकीच्या पध्दतीने बंधाऱ्याची उंची वाढवल्याने शेत जमिनींचे नुकसान; गुत्तेदाराच्या चौकशीची मागणी

तलवाडा । प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातील घाटशीळ पारगाव येथील सव्र्व्हे नं.१६ मध्ये नदीवरील बंधाऱ्याची उंची चुकीच्या पध्दतीने वाढवल्यामुळे व अयोग्य व्यवस्थापनामुळे नदी काठच्या जमिनींचे प्रचंड नुकसान झाले असून तात्काळ स्थळ पंचनामा करून संबंधित कामाची चौकशी करा आणि नुकसान भरपाई द्या अशी मागणी घाटशीळ पारगाव येथील शेतकरी त्रिंबक खेडकर व इतरांनी केली आहे.



घाटशीळ पारगाव येथील सर्व्हे नं. १६ मध्ये नदी काठलगत असलेल्या जमिनींचे पावसामुळे प्रचंड नुकसान झाले आहे. दोन वर्षापुर्वी नदीवरील बंधाऱ्याची उंची वाढवण्याचे काम करण्यात आले होते. परंतू संरक्षक भिंतीची कोणतीही रचना केली गेली नाही. या चुकीमुळे सदर बंधाऱ्याने पाणी

अडवल्यामुळे नदीच्या पाण्याचा प्रवाह लगतच्या जमिनीतून वाढू लागला आहे. नदीने पात्र बदलल्याने शेती वीस फुट खोलीने वाहून गेली आहे. पाण्याचा प्रवाह असाच राहिल्यास माझ्या व माझ्या कूटूंबियांच्या सव्र्व्हे नं. १७ मधील शेतीलाही धोका निर्माण झाल्याचे शेतकरी खेडकर यांनी म्हटले आहे. याबाबत त्यांनी पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्याकडे तक्रार केली आहे.

# सरवर पिंपळगावचे तात्काळ पुनर्वसन करावे -मोहन जगताप

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील सरवर पिंपळगाव, गंगामसला, सुरुमगाव, गुंजथडी या गावांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेती, घरे व जनजीवनाचे प्रचंड नुकसान झाले आहे. या गावांचा काल दि. २५ रोजी दौरा करून नुकसानीची पाहणी केली यावेळी मोहनराव जगताप यांनी तात्काळ मदत व पुनर्वसनाची मागणी केली.



शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. अनेक कुटुंबांची घरे पाण्याखाली गेली असून घरगुती साहित्य, धान्य व जनावरांचे खाद्य वाहून गेले आहे. तसेच काही ठिकाणी शाळा व अंगणवाडी केंद्रांना देखील पाणी शिरल्याने शैक्षणिक अडथळे निर्माण झाले आहेत. पुराच्या पाण्यामुळे जनावरांचेही मोठे नुकसान झाले आहे, चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे.

मोहनराव जगताप यांनी शासनाला कळविले आहे की बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा व तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना ◀◀ पान २ वर

# माजी मंत्री प्रा. सुरेश नवले यांनी प्रत्यक्ष बांधावर जाऊन केली नुकसानीची पाहणी

बीड । प्रतिनिधी

आज माजी मंत्री प्रा. सुरेश नवले यांनी अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या उमरद जहांगीर, पारगाव शिरस, सोनगाव, साक्षर पिंपरी, पौंडूळ, खांबा, लिंबा, खलापुरी, जांब, आर्वी, तरडगव्हाण, गाजीपुर, हाजीपुर गावासह इतरही गावांची प्रत्यक्ष बांधावर जाऊन पाहणी केली असता अतोनात नुकसान झाल्याचे पाहून वेदना झाल्याचे सांगितले.



बीड जिल्ह्यात एकूण ११ तालुके असून शासन निर्णयामध्ये बाधित शेतकऱ्यांची संख्या ११४७७३ म्हणजे सरासरी एका तालुक्यात फक्त आणि फक्त १०००० शेतकरीच या अतिवृष्टीमध्ये बाधित झालेले दिसून येत असून संपूर्ण जिल्ह्यासाठी फक्त ५६.७३ कोटी तुटपुंजा निधी मंजूर केला आहे तो जिल्ह्यातील लाखो नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसल्याप्रमाणे आहे.

परंतु सत्य परिस्थिती अशी नाही याबाबत महसूल विभागाने त्यांच्या यंत्रणेमार्फत बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये पावसाने रुद्रावतार धारण केलेले असून जिल्ह्यातील सर्व ◀◀ पान २ वर

# नदीकाठच्या पुराने कायमस्वरूपी बाधीत झालेले क्षेत्र कायमस्वरुपी संपादित करावे -भाई थावरे

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव विधानसभा मतदारसंघातील गोदावरी,सिंधफाना व कुंडलीका नदीकाठच्या शेतकऱ्यांच्या शेतात पुराचे पाणी घुसुन पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याने शासनाने नदीकाठच्या बाधीत होणारे क्षेत्र कायमस्वरुपी संपादीत करण्यात यावे,बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा,बाधीत शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपायांची मदत जाहीर करण्याच्या मागणीसाठी शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने दि ०७ ऑक्टोबर रोजी तहसील कार्यालयावर शेतकऱ्यांचा आक्रोश मोर्चा काढण्यात येणार असल्याचे भाई गंगाभिषण थावरे यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.



यासंदर्भात भाई गंगाभिषण थावरे यांनी त्यांच्या संपर्क कार्यालयात दि २५ सप्टेंबर गुरुवार रोजी दुपारी १:०० वाजता घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले की,बीड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे,गोदावरी,सिंधफाना,कुंडलीका नदीपाकाठच्या गावात पुराच्या पाण्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतात पाणी घुसून पिकांचे मोठे प्रमाणावर नुकसान झाल्याने,शासनाने नदीकाठचे होणारे बाधित क्षेत्र कायमस्वरुपी संपादीत करुन, संबंधित शेतकऱ्यांना मावेजा देण्यात यावा, शासनाने बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा,या मागणीसाठी शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने दि ०७ ऑक्टोबर मंगळवार रोजी शेतकऱ्यांचा माजलगाव तहसील कार्यालयावर भव्य आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे,तरी या आक्रोश मोर्चात बाधित शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भाई गंगाभिषण थावरे यांनी पत्रकार परिषदेत केलें आहे.

# जुळ्या बंधूंनी जपले सामाजिक भान

## पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी दिला एक दिवसाचा पगार




आष्टी । प्रतिनिधी

मराठवाड्यात पावसाने हाहाकार माजवला असून या मुळे शेतकरी पूर्णपणे संपून गेल्याचे विदारक चित्र सर्वत्र दिसून येत आहे.शिवाय शेती देखील पूर्णपणे खरडून गेल्याने पुढील काही वर्ष या बळीराजाला स्थिर स्थावर होण्यासाठी लागतील अशी एकंदरीत परिस्थिती आहे.याच पार्श्वभूमीवर आष्टीतील सचिन रानडे यांनी सामाजिक भान जपले जावे व बळीराजाला एक सक्षम आधार म्हणून राज्य शासन त्याच्यापरीने मदत करेल मात्र यामध्ये आता सरकारी कर्मचाऱ्यांनी पुढे येऊन आपल्या एक दिवसाचा पगार या शेतकऱ्यांना मदतीसाठी शासन दरबारी जमा करण्याचे आवाहन सोशल मीडियाच्या माध्यमातून केले होते.याला तत्काळ प्रतिसाद देत आष्टी शहरातील जिल्हा परीषदेत कार्यरत असलेले दोन जूळे बंधू अमोल कदम आणि सचिन कदम यांनी पूरग्रस्तांने चिंताग्रस्त ◀◀ पान २ वर



# अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांचे पंचनामे करण्यास सुरूवात

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसुफवडगांव व परिसरात गेल्या काही दिवसापुर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे अतोनात नुकसान झाले असुन आता कृषी व महसूल विभागाच्या वतीने यांचे पंचनामे करण्यात येत आहेत.

याबाबत सविस्तर वृत्त असे कि गेल्या काही दिवसांपासून पावसाने युसुफवडगांव व परिसरत अक्षरक्षः थैमान घातले आहे त्याच गत ४/५ दिवसापुर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे जिकडे पाहावे तिकडे पाणीच पाणी झाले आहे त्यामुळे ◀◀ पान २ वर

# पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्याला जोडणाऱ्या शिराळ येथील पूलाची उंची वाढवावी -खंडागळे

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील मेहकरी,कडी व कांबळी या तीन नद्या शिराळजवळ एकत्रीत येतात. येते मोठ्या प्रमाणात पाणी (पुर) येतो .. सध्या असलेला पुल हा कमी उंचीचा असल्याने सतत पुलावरुन पाणी जाते वाहतुक खंडीत होत आहे.म्हणून शासनाने शिराळ येथील पुलाची उंची वाढवावी अशी मागणी डा.बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे जिल्हाध्यक्ष तथा माजी पंचायत ◀◀ पान २ वर



# ओला दुष्काळ जाहिर करुन नुकसान भरपाई द्या -आमटे

## ना.अजित पवार यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा सह मराठवाड्यात पावसाने कहर मांडला आहे. अनेक शेतकऱ्यांचे कुटुंब उध्वस्त झाले आहे. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असून ओला दुष्काळ जाहिर करून त्वरित मदत करण्यात यावी असे मागणी शिवसंग्राम किसान आघाडीचे जिल्हाप्रमुख राजेंद्र आमटे यांनी पालकमंत्री अजित पवार यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.



बीड जिल्ह्यासह मराठवाड्यात अतिवृष्टी मुळे शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे नदी काठची जमीन वर्षात झाली आहे सर्व पीक पाण्याने वाहून गेले आहे अनेकांच्या जमिनी वाहून गेले आहेत. पशुधन दगावले आहे. अनेकांची गोठे, घर वाहून गेली आहेत. अतिवृष्टीमुळे शेतकरी हतबल झाला असून काय करावे याचा विचारही त्याला सुचत नाही मुलांचे शिक्षण संसाराचा गाडा मुलीचे लग्न असे एक ना अनेक प्रश्न समोर असताना अतिवृष्टीने दिलेला फटका त्यांच्या मानेला लागला असून जीव सोडून देण्याची वेळ या शेतकऱ्यांवर आली आहे. घरात काही नाही, शेतात पीक नाही, गोठ्यात पशुधन नाही, जवळ पैसा नाही अशा अवस्थेत हातात झालेला शेतकरी आता मायबाप असलेल्या सरकारकडेच डोळे लावून बसला आहे या वेळेतच शेतकऱ्याला मदत झाली नाही ◀◀ पान २ वर

**म्हाळस जवळा महसूल मंडळ मधील गावांचा अतिवृष्टी नुकसान भरपाई यादीत समावेश करण्यात आला नव्हता मात्र यावेळी विनंती केली असता जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना म्हसळा जवळा महसूल मंडळ समावेश करण्याच्या सूचना ना. अजित पवार यांनी दिल्या. जिल्हाधिकारी यांनी म्हाळस जवळा महसूल मंडळ समावेश करण्यात येईल असे सांगितले.**

# पावसाने उद्ध्वस्त झालेल्या संसारांना जावेद कुरेशींचा आधार

बीड । प्रतिनिधी

अतिवृष्टीने बीड शहरातील मोमीन पुरा, गांधीनगर, बालेपिर व अख्तर नगरसारख्या झोपडपट्ट्यांत संसार उध्वस्त झाले. गल्लो गल्लीत पाणी घुसल्याने साहित्य भिजले, भाकरी-भात चुरगळले. गरीबांच्या डोळ्यात अश्रू तरळले, पण याच संकटकाळात एका समाजसेवकाने हात जोडून मदतचा हात पुढे केला. एकता युवा मंचचे संस्थापक अध्यक्ष जावेद भैय्या कुरेशी! 'मानवता हीच खरी धर्म' हे ध्येय डोळ्यांत बांधून, दररोज २०० किराणा किट वाटप करत, ते हजारो कुटुंबांना आधार देत आहेत. बुधवारपर्यंत त्यांच्या या सत्कार्याने संपूर्ण बीड जिल्ह्यात त्यांचे कौतुक होत आहे.

मुसळधार पावसाने बीडला झोडपले. २३ सप्टेंबरपर्यंत सतत पडलेल्या पावसाने गल्लो गल्लीत पाणी घूसले होते. मोमीन पुरा येथील एका ५० वर्षीय महिला सांगतात, ''घरात पाणी घुसले, तांदूळ-डाळी भिजल्या. मुलांना भाकरी कशी द्यायची? जावेद भैय्या आले, किट दिले. फरिश्ते सारखे वाटले!'' अशा शेकडो कुटुंबांच्या



जखमांवर मलम लावत, जावेद भैय्या कुरेशींची एकता युवा मंचची टीम सकाळपासून रात्रीपर्यंत धावपळ करतेय. प्रत्येक किटमध्ये तांदूळ, गहू, डाळी, तेल, साबण-सोडा यांसारखे दैनंदिन गरजा. ''सर्व जाती-धर्मांसाठी हे काम. गरीबी हीच खरी आपत्ती, ती दूर करण्यासाठी मी झटतो,'' असा निर्धार जावेद भैय्या सांगतात. तसेच त्यांचे सामाजिक कार्य आता लाखो लोकांपर्यंत पोहोचले आहे.

जावेद भैय्यांचा हा प्रवास प्रेरणादायी आहे. २०१५ मध्ये एकता युवा मंचची स्थापना केली. रक्तदान शिबिरांपासून आरोग्य तपासणीसह अनेक उपक्रम राबवले. पण या पूरसंकटात त्यांचा मानवतावादी दृष्टिकोन अधिक चमकला. ''पूर आला तो विनाश आणायला, पण आपण एकत्र आलो तर बांधू शकतो,'' असं ते कार्यकर्त्यांना सांगतात. बुधवारपर्यंत २,००० हून अधिक किट वाटप झाली आहे. जावेद भैय्या कुरैशी सारखे लोक असतील तर समाज मजबूत होईल,'' असा विश्वास नागरिकांनी व्यक्त केला.

या संकटात जावेद भैय्या कुरेशींच्या या प्रयत्नांनी गरीबांच्या चेहऱ्यावर हास्य परतले. जावेद भैय्यांसारखे लोक समाजात असतील तर पूरही हरकत घेत नाही. बीडच्या या 'भैय्या'ने दाखवले, की एकट्याचा हातही समाजाला वाचवू शकतो.

# संत -महंत व मान्यवरांच्या उपस्थितीत 'बाजीराव पेट्रोलियम' पेट्रोल पंपाचा शनिवारी होणार शुभारंभ

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी शहराच्या सेवा क्षेत्राच्या वैभवात भर घालणारा अत्याधुनिक असा ''बाजीराव पेट्रोलियम'' या नवीन पेट्रोल पंपाचे येत्या शनिवार, दि. २७ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०.३१ वाजता संत,महंत व मान्यवरांच्या उपस्थितीत शुभारंभ करण्यात येणार असल्याची माहिती माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी दिली आहे.



ज्योतिर्लिंग वैद्यनाथ मंदिर पासून काही अंतरावरच परळी ते नंदगौळपुस-बर्दापूर रोडवर, श्रद्धानंद गुरुकुल आश्रमासमोर उभारण्यात आलेल्या बाजीराव पेट्रोलियम या भारत पेट्रोलियमच्या अत्याधुनिक पंपावर २४ तास इंधन सेवा उपलब्ध राहणार असून ग्राहकांसाठी सर्व आधुनिक सुविधा पुरवण्यात येणार आहेत. या पेट्रोल पंपाचा शुभारंभ राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे आणि माजी मंत्री, आमदार धनंजय मुंडे यांच्या शुभहस्ते होणार आहे. उद्घाटन प्रसंगी शांतिब्रह्म गुरुवर्य ह.भ.प.प. पू.महादेव महाराज चाकरवाडीकर, धर्मगुरू प.पू.अमृताश्रम स्वामी आणि १०८ नंदीकेश्वर शिवाचार्य स्वामी महाराज यांचे आशीर्वाद ◀◀ पान २ वर

# ओबीसींच्या मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे -बोडखे

आष्टी । प्रतिनिधी

ओबीसी समाजाचे राष्ट्रीय नेते तथा समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष, कॅबिनेट मंत्री ना. छगनराव भुजबळ यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि इतर मान्यवरांच्या उपस्थितीत ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी ओबीसी समाजाचा भव्य महाएल्गार मेळावा रविवार दि.२८ सप्टेंबर २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण बीड येथे आयोजित करण्यात आला.



या मेळाव्यास राज्याचे कॅबिनेट मंत्री ना.छगनराव भुजबळ साहेब हे प्रमुख मार्गदर्शन करणार असल्याची माहिती महात्मा फुले समता परिषदेचे आष्टी तालुकाध्यक्ष दत्ताभाऊ बोडखे यांनी दिली आहे.

हैदराबाद गॅझेटिअरच्या माध्यमातून मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण लागू करण्याचा जीआर महाराष्ट्र शासनाने काढला आहे. यामुळे ओबीसी ◀◀ पान २ वर

# मंगल कार्यालयात झालेल्या चोरीचा तपास लागेना

## बीड एस.पी. कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील एका मंगल कार्यालयामध्ये ४ लाख रुपयांचे दागिने चोरीस गेले एक वर्ष झाले तरी चोरांचा तपास लागत नसल्यामुळे मुख्याध्यापक साईनाथ बोडखे यांनी बीड येथील जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय समोर उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

या विषयीचे सविस्तर वृत्त असे की,विवाहाच्या काही मिनिटा अगोदर ४ लाख २५ हजार रु.चे दागीने अज्ञात चोरांनी लंपास केल्याची घटना जुलै २०२४ महिन्यात झालेली आहे. यबाबत वरपिता मुख्याध्यापक साईनाथ बोडखे यांनी आष्टी पोलीसांत लेखी तक्रार केली आहे. वर्ष उलटून गेले तरी अद्याप तपास लागलेला नाही.

कडा पोलीसांसमोर या तपासाचे आव्हान निर्माण झाले आहे.येत्या आठ दिवसात तपास लागला नाही तर जिल्हा पोलीस प्रमुख (एस.पी.) कार्यालयासमोर उपोषणाचा इशारा साईनाथ बोडखे यांनी लेखी निवेदनाव्दारे दिला आहे. आष्टी तालुक्यातील आनंदवाडी येथील मुख्याध्यापक साईनाथ बोडखे याचे चिरंजीव प्रदीप याचा खाकाळवाडी येथील दीपक नवले याची मुलगी निकीता हिच्याशी बीड- अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील एका मंगल कार्यालयात विवाह झाला.सकाळी हळद आणि लग्न हे दोन्हीही विधी एकाच दिवशी ◀◀ पान २ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# झक मारली, पवार कुटुंबाला आम्ही निवडून दिलं;
# लक्ष्मण हाकेंची जीभ घसरली



**पुणे । प्रतिनिधी**
राज्यात गेल्या काही महिन्यांपासून आरक्षणाचा संघर्ष टोकाला गेला असून काही ठिकाणी ओबीसी आणि मराठी सामने-सामने आल्याचं पाहायला मिळत आहे. एकीकडे मराठा आरक्षणासाठी आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी कंबर कसली असताना दुसरीकडे ओबीसीतून मराठा आरक्षणाला विरोध करत लक्ष्मण हाके (ड्ढारप हरज्ञश) यांनी मेळावा आणि दौऱ्यांमधून ओबीसींना एकत्र करण्याचं काम सुरू केलंय. त्याच पार्श्वभूमीवर काही दिवसांपूर्वी शरद पवाराच्या बारामतीमध्ये जाऊन त्यांनी मोर्चा काढण्याचा प्रयत्न केला. या मोर्चाला पोलिसांनी परवानगी नाकारली होती, तरीही त्यांनी ओबीसी बांधवांसह मोर्चा काढत पवार कुटुंबीयांवर गंभीर आरोप केले होते. आता, पुन्हा एकदा हाकेंनी पवार कुटुंबीयांवर घणाघाती टीका केली.

झक मारली आणि पवार कुटुंबाला आम्ही निवडून दिलं, अशी घणाघाती टीका ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी बारामतीतून पवार कुटुंबीयांवर केली आहे. ५ सप्टेंबरला बारामतीमध्ये ओबीसी एल्गार मोर्चाचा आयोजन करण्यात आलं होतं, याला पोलिसांनी परवानगी नाकारली तरी देखील हा मोर्चा काढण्यात आला आणि त्यानंतर १४ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. लक्ष्मण हाके यांच्यासह आज १४ जण बारामती पोलीस ठाण्यामध्ये आले होते, तेव्हा आम्हाला अटक करा अशी मागणी यावेळी करण्यात आली. त्यानंतर, पोलिसांकडून नोटीस देऊन त्यांना सोडण्यात आलं असलं तरी यावरून मोठे राजकारण सुरू झाले. लक्ष्मण हाके यांनी गंभीर आरोप केले असून अजित पवारांच्या सांगण्यावरुनच आम्हाला अटक करण्यात आल्याचं त्यांनी म्हटलं आहे. पवार कुटुंबीयांनी आमच्या मागच्या ४ पिढ्या संडवल्या आणि पुढच्या ४ पिढ्या शिकू नये म्हणून महाज्योतीला निधी देत नाहीत, वसतिगृह बांधू देत नाहीत. एखादा पोरगा बोलायला लागला की त्याच्यावर अजित पवार गुन्हे दाखल करतात, अशा शब्दात लक्ष्मण हाकेंनी पवार कुटुंबावरच आपण टीका का करतो हे बारामतीतून सांगितलं. अजित पवारांच्या सांगण्यावरून आमच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचं लक्ष्मण हाके यांनी म्हटलं. तर पवार कुटुंब गेली अनेक वर्ष महाराष्ट्राच्या बोडक्यावर बसलंय, आम्ही पवारांना झक मारायला निवडून दिलं, असा शब्दात हाकेंनी आपला संताप व्यक्त केला. दरम्यान, आर्थिक निकषावरच आरक्षण द्यायला पाहिजे, असे खासदार सुप्रिया सुळेंनी म्हटलं. त्यावरुन, सुप्रिया सुळे ह्या उत्कृष्ट संसदपटू नसून निकृष्ट संसदपटू असल्याचंही हाकेंनी म्हटलं.

## झपूर्झा म्युझियम ऑफ आर्ट अँड कल्चरतर्फे आ मोरी बंगला प्रदर्शनाचे गॅलरी नं. ७ मध्ये उद्घाटन



**पुणे । प्रतिनिधी**
झपूर्झा म्युझियम ऑफ आर्ट अँड कल्चरमध्ये गॅलरी नं. ७ मध्ये आ मोरी बंगला या नव्या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रदर्शनाद्वारे बंगालच्या कला व संस्कृतीतील विविधता आणि सर्जनशीलतेचा उत्सव साजरा करण्यात आला आहे. प्रख्यात कथक नृत्यांगना गुरु शमा भाटे यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. यावेळी संस्थापक अजित गाडगीळ आणि रेणु गाडगीळ उपस्थित होते.

क्युरेटर मृदुछंदा सिन्हा यांनी साकारलेल्या या प्रदर्शनात बंगालमधील कला, हस्तकला व सांस्कृतिक अभिव्यक्तीचा अनोखा मेळ पाहायला मिळतो. वस्त्रकला, चित्रकला, धार्मिक विधींसाठी वापरली जाणारी साधने तसेच सजावटी कलावस्तूंपर्यंत या प्रदर्शनात समावेश आहे. यामधून बंगालचा बहुपेडी इतिहास आणि भारताच्या सांस्कृतिक परंपरेतील त्याचे मोलाचे योगदान अधोरेखित केले गेले आहे.

प्रसंगी बोलताना गुरु शमा भाटे यांनी बंगालच्या कलात्मक परंपरांनी पिढ्यान्पिढ्या कलाकारांना प्रेरित केले असून आजही ती प्रेरणा तितकीच महत्त्वाची असल्याचे सांगितले. क्युरेटर मृदुछंदा सिन्हा यांनी हे प्रदर्शन म्हणजे बंगालच्या सौंदर्यदृष्टीचा प्रवास असल्याचे स्पष्ट केले-जेथे परंपरा, प्रतीकात्मकता आणि आधुनिकतेचा सुंदर संगम दिसून येतो. या प्रदर्शनाची अधिक सखोल ओळख करून देण्यासाठी शनिवार, ४ ऑक्टोबर रोजी दुपारी १:३० वा. आणि सायं. ५:३० वा. गॅलरी नं. ७ मध्ये क्युरेटर मृदुछंदा सिन्हा यांच्याकडून विशेष वॉकथ्रू आयोजित करण्यात येणार आहेत. या वेळी रसिक प्रेक्षकांना प्रदर्शनातील कलावस्तू, त्यामागील परंपरा व कथा यांची थेट माहिती मिळण्याची संधी मिळेल.

आ मोरी बंगलाच्या माध्यमातून झपूर्झा पुन्हा एकदा आपल्या शैक्षणिक व सांस्कृतिक संवाद केंद्राच्या भूमिकेला अधोरेखित करत आहे. भारताच्या विविधतेने नटलेल्या कलात्मक वारशाचा अनुभव घेण्यासाठी रसिकांना आमंत्रित करण्यात येत आहे. हे प्रदर्शन झपूर्झा म्युझियम ऑफ आर्ट अँड कल्चरच्या गॅलरी नं. ७ मध्ये सर्वांसाठी खुले आहे.

## मुसळधार पावसाचा फटका.! 'वैद्यकीय शिक्षण'च्या परीक्षा पुढे ढकलल्या

**पुणे । प्रतिनिधी**
राज्यातील वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय व दंत महाविद्यालय तसेच संलग्नित रुग्णालयांमधील गट-क तांत्रिक व अतांत्रिक संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी सुरू असलेल्या राज्यस्तरीय ऑनलाईन स्पर्धा परीक्षा पुढे ढकलण्याचा आदेश वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिला आहे.

राज्यातील अनेक भागांत मागील आठवड्यापासून सुरू असलेल्या अती मुसळधार पावसामुळे पूरपरिस्थिती निर्माण झाली असून, या आपत्कालीन परिस्थितीमुळे परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर पोहोचणे पावसामुळे जिकिरीचे व अडचणीचे ठरले होते. या अनुषंगाने सर्व परीक्षार्थींचे पुढील होणारे नुकसान टाळण्यासाठी वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री मिसाळ यांनी तत्काळ परीक्षा पुढे ढकलण्याचे आदेश दिले.

वैद्यकीय शिक्षण व आयुष आयुक्तालयाने जारी केलेल्या सूचनेनुसार, २५ व २६ सप्टेंबर २०२५ रोजी होणाऱ्या परीक्षांचे वेळापत्रक बदलण्यात आले आहे. या संदर्भातील सुधारीत वेळापत्रक लवकरच प्रसिद्ध केले जाणार असल्याचे आयुक्तालयाने स्पष्ट केले आहे. उमेदवारांनी अधिकृत संकेतस्थळावर अद्ययावत माहिती तपासत राहावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## नाथाभाऊंचे जावई प्रांजल खेवलकरला जामीन मंजूर

**पुणे । प्रतिनिधी**
पुण्याच्या खराडी भागातील कथित ड्रग्स रेव्ह पार्टी प्रकरणाने राज्याच्या राजकारणात खळबळ उडवली होती. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) नेते एकनाथ खडसे यांचे जावई आणि रोहिणी खडसे यांचे पती डॉ. प्रांजल खेवलकर यांना पोलिसांनी रंगेहाथ पकडले होते. या प्रकरणात गंभीर आरोप झाल्यानंतर दोन महिन्यांच्या कोठडीत राहिलेल्या खेवलकर यांना पुणे जिल्हा सत्र न्यायालयाने अखेर जामीन मंजूर केला आहे. या निर्णयाने खडसे कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला असून, राजकीय वातावरणात नव्या चर्चांना उधाण आले आहे.



जुलै महिन्यात पुणे पोलिसांच्या क्राईम ब्रँचने खराडीतील एका स्टुडिओ अपार्टमेंटमध्ये छापा टाकला होता. या छाप्यात खेवलकर यांच्यासह सात जणांना अटक करण्यात आली होती, ज्यात दोन महिला होत्या. पोलिसांनी कोकेन, मारिजुआना, हुकाह पॉट्स आणि मद्यसाठा जप्त केला होता. या प्रकरणात नार्कोटिक ड्रग्स अँड सायकोट्रोपिक सबस्टन्सेस (छऊझड) कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

खेवलकर यांच्या मोबाईल फोन आणि लॅपटॉपवर अनेक महिलांचे अश्लील व्हिडिओ सापडल्याचा दावा करण्यात आला असून, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी याबाबत गंभीर आरोप केले होते. चाकणकर यांनी म्हटले होते की, हे एक मोठे रॅकेट असून, खेवलकर यांनी अनेक महिलांना फसवले आहे. या अटकेमुळे राजकारणात वादळी चर्चा सुरू झाल्या. एकनाथ खडसे यांनी पोलिसांवर राजकीय षड्यंत्राचा आरोप करत म्हटले होते की, हे ट्रॅपमध्ये अडकविण्याचा प्रयत्न आहे. जर माझा जावई चुकीचा असेल, तर मी त्याचे समर्थन करणार नाही, पण सत्य समोर येईल. खडसे यांनी पोलिसांच्या छाप्यातून काढलेल्या फोटोंना माध्यमांतून व्हायरल करण्याबाबतही आक्षेप घेतला होता. दुसरीकडे, शिवसेना (युबीटी) च्या नेत्यांनी याला सरकारविरोधी बोलणाऱ्यांना धक्का देण्याचा प्रयत्न म्हटले होते.

पतीच्या अटकेनंतर रोहिणी खडसे या वकिल असल्याने कोर्टात ब्लॅक कोट घालून पतीचे समर्थन करण्यासाठी मैदानात उतरल्या. त्यांनी कोर्टात उपस्थित राहून जामिनासाठी प्रयत्न केले आणि म्हटले होते, योग्य वेळी मी सर्व आरोपांवर उत्तरे देईन. रोहिणी खडसे यांनी शरद पवार यांचीही पुण्यात भेट घेतली होती.सुप्रिया सुळे यांनी सोशल मीडियावर रोहिणी खडसे यांच्या समर्थनार्थ पोस्ट शेअर केली होती. या प्रकरणात खेवलकर यांच्या फ्लॅटमध्ये यापूर्वीही अशा प्रकारच्या पार्टी झाल्याचे उघड झाले असून, पोलिसांनी तपास वाढवला होता. दोन महिन्यांच्या न्यायालयीन कोठडीत राहिल्यानंतर पुणे सत्र न्यायालयाने खेवलकर यांसह इतर आरोपींना जामीन मंजूर केला आहे. न्यायालयाने हे सांगितले की, तपास प्रक्रियेत कोणतीही अडचण येणार नाही, अशी अट घातली आहे. या निर्णयानंतर खेवलकर यांची लवकरच जेलमधून सुटका होण्याची शक्यता आहे. जामीन मिळाल्यानंतर रोहिणी खडसे यांच्याकडून प्रकरणावर काय भाष्य येईल, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

## माजी आमदार सुनील टिंगरे पूरग्रस्तांसाठी सरसावले

**पुणे । प्रतिनिधी**
मराठवाडा आणि सोलापूर जिल्ह्यातील पूरग्रस्तांना मदत करण्यासाठी माजी आमदार सुनील टिंगरे पुढे सरसावले आहेत. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या आमदारांना एका महिन्याचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा करण्याचे आवाहन केले होते. त्याला प्रतिसाद देत टिंगरे यांनी तीन महिन्यांची पेंशन मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा करण्याची घोषणा केली आहे. तसेच, इतर माजी आमदारांनीही यासाठी पुढाकार घ्यावा, अशी विनंती त्यांनी केली आहे.



मागील काही दिवसांपासून मराठवाडा आणि सोलापूर जिल्ह्यात पावसाने धुमाकूळ घालत मोठ्या प्रमाणावर शेतीचे नुकसान केले आहे. शासनाने शेतकऱ्यांसाठी मदत जाहीर केली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी पूरग्रस्त भागाला भेट देत सर्वतोपरी मदतीचे आश्वासन दिले आहे. या पार्श्वभूमीवर पुण्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष आणि माजी आमदार सुनील टिंगरे यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी पुढाकार घेतला आहे.

## न्यायालयाचा कठोर निर्णय ; मुलीवर अत्याचार करणाऱ्या शिक्षकाला २० वर्षे शिक्षा

**पुणे । प्रतिनिधी**
शाळकरी मुलीवर अत्याचार करणाऱ्या शिकवणी चालकाला विशेष न्यायालयाने २० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सुनावली. संजय रमेश शर्मा (वय ५६, रा. जगतापनगर, वानवडी) असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. शाळकरी मुलगी शर्माकडे शिकवणीला जायची. ३ ऑगस्ट ते २९ सप्टेंबर २०२१ या कालावधीत शर्माने शाळकरी मुलीला धमकाविले. मुलीच्या बहिणीला जीवे मारण्याची धमकी देऊन त्याने तिच्यावर अत्याचार केले. घाबरलेल्या मुलीने या घटनेची माहिती कुटुंबीयांना दिली.



याबाबत वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद देण्यात आली, शर्मा याच्याविरुद्ध बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण कायद्यान्वये (पोक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचा तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक सुधा चौधरी यांनी करून शर्माविरुद्ध न्यायालयात आरोपपत्र दाखल केले.सरकार पक्षाकडून सरकारी वकील नितीन कोंघे यांनी बाजू मांडली. आरोपी शर्माने केलेला गुन्हा गंभीर स्वरूपाचा असून, शिक्षकी पेशाला काळिमा फासणार आहे.

त्याला जास्तीत जास्त शिक्षा सुनावण्यात यावी, अशी विनंती सरकारी वकील कोंधे यांनी युक्तिवादात केली. पीडित मुलीची साक्ष, तसेच पुरावे ग्राह्य धरून न्यायालयाने शर्मा याला २० वर्षे सक्तमजुरीसह ३७ हजार रुपयांचा दंड ठोठावला. दंड न भरल्यास नऊ महिने सश्रम कारावासाची तरतूद न्यायालयाने केली. परिमंडळ पाचचे पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली न्यायालयीन कामकाज पार पाडण्यात आले. दिनेश जाधव यांनी न्यायालयीन कामकाजात सहाय केले.

## ७% परताव्याचं आमिष आणिगुंतवणूकदाराची एक कोटी ९२ लाखांची फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**
गुंतवणुकीवर चांगला परतावा देण्याच्या आमिषाने १ कोटी ९२ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी विमानतळ पोलिसांनी एकाला अटक केली. सचिन विलास कांबळे (वय ४२, रा. थेरगाव, पिंपरी-चिंचवड) असे आरोपीचे नाव आहे. याबाबत एका व्यावसायिकाने विमानतळ पोलिसांत फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी कांबळे आणि तक्रारदार व्यावासायिकाची गेल्या वर्षी ओळख झाली होती. कांबळेने लोहगाव परिसरात खासगी कार्यालय सुरू केले होते. तक्रारदार व्यावसायिक लोहगाव भागात राहायला आहे.आरोपीने व्यावसायिकाला गुंतवणुकीवर सात टक्के परताव्याचे आमिष दाखविले होते. व्यावसायिकाने सुरुवातीला ३३ लाख ८० हजार रुपये गुंतविले. तक्रारदार आणि परिचितांनी कांबळेकडे एकूण एक कोटी ९२ लाख ९५ हजार रुपये गुंतवणुकीस दिले. सुरुवातीला परताव्यापोटी काही रक्कम दिली. त्यानंतर कांबळेने त्यांना परतावा देणे बंद केले. त्याबाबत विचारणा केल्यानंतर कांबळेने टाळाटाळ केल्यावर फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर गुंतवणुकदारांनी तक्रार अर्ज दिला. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शरद शेळके तपास करत आहेत.

## विमानात शस्त्र घेऊन जाण्याचा प्रयत्न! ; पुणे विमानतळावर महिलेविरोधात गुन्हा




**पुणे । प्रतिनिधी**
लोहगाव विमानतळावर मंगळवारी (दि. २३) रात्री सुरक्षा तपासणीत एका महिलेच्या हँडबॅगमधून पिस्तूल आणि दोन जिवंत काडतुसे सापडल्याने खळबळ उडाली. तिच्याकडे शस्त्र परवाना नसल्याने विमानतळ पोलिसांनी तिच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.वैशाली वैभव दोशी (वय ४४, रा. कुर्डुवाडी, जि. सोलापूर) असे गुन्हा दाखल झालेल्या महिलेचे नाव आहे. याबाबत विमान कंपनीचे प्रतिनिधी जयेंद्र शिरोडकर यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित महिला ही मंगळवारी रात्री पुणे विमानतळावरून इंदौरमार्गे दिल्लीला जाण्यासाठी आली होती. सिक्युरिटी लेव्हल-२ ए मशिनवरून सामानाची तपासणी सुरू असताना तिच्या हँडबॅगमध्ये पिस्तूल आणि मॅगझिनमध्ये दोन जिवंत काडतुसे आढळली. त्यामुळे विमानतळ सुरक्षा यंत्रणेत तात्काळ अलर्ट पसरला. प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हे मोठे उल्लंघन मानले जात आहे. प्राथमिक चौकशीत संबंधित महिलेकडे शस्त्र परवाना नसल्याची माहिती विमानतळ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक गोविंद जाधव यांनी दिली. विमानतळ पोलीस पुढील तपास करीत आहेत.

## पुण्यात बांधकाम कामगारांच्या हक्कासाठी आंदोलन; नोंदणी पोर्टलच्या समस्यांविरोधात संताप

**पुणे । प्रतिनिधी**
बांधकाम कामगारांच्या गंभीर समस्यांबाबत आज दि. २४ सप्टेंबर रोजी 'श्रमिक हक्क आंदोलन' या कामगार संघटनेतर्फे 'अप्पर कामगार आयुक्त कार्यालय, पुणे' इथे आंदोलन करण्यात आले. कामगारांची त्यांच्याच हक्काच्या योजनांसाठी हेलपाटे घालावे लागत असून याबाबत हे आंदोलन करण्यात आले.




गेले तीन महिने नोंदणीचे पोर्टल सातत्याने बंद असल्याने त्यासंबंधीची कामे अडून राहतात. तसेच अर्जात काही अडचणी असतील तर उश्ररीलषळलरींळेप साठीची ऑनलाईन प्रक्रिया बदलल्याने कामगारांना कोणतीही संधी न मिळता अर्ज थेट नाकारले जातात. परिणामी एक साधा अर्ज मंजुर करुन घेण्यासाठी कामगारांना सुट्टी काढून अनेकदा हेलपाटे घालावे लागतात. यामुळे हातावर पोट असणाऱ्या कामगारांच्या त्यांच्याच हक्काच्या योजनांसाठी केली जाणारी ही क्रुर व अमानुष थट्टा असल्याचे संघटनेतर्फे सांगण्यात आले.

हे तातडीने रोखण्यासाठी बांधकाम कामगारांनी आज आंदोलन केले. याला येरवडा, वारजे, कोथरुड व इतर भागातील शेकडो कामगार उपस्थित होते. आंदोलकांना सहाय्यक कामगार आयुक्त पवार भेटायला आले. त्यांनी कामगारांच्या प्रश्नांसंदर्भात ठोस उपाययोजना असणारी नवी सुधारित कार्य प्रक्रिया तयार करून त्याबाबत पुढील १५ दिवसात बैठक आयोजित करण्याचे आश्वासन आंदोलनकर्त्यांना दिले. तसेच प्रलंबित प्रकरणांची चौकशी करून त्याबाबत कारवाई केली जाईल असेही सांगितले.

यावेळी श्रमिक हक्क आंदोलनाचे सरचिटणीस सागर सविता धनराज यांनी महिनाभरात नवी प्रक्रिया लागू न केल्यास आंदोलन तीव्र केले जाईल असा इशारा दिला. बांधकाम मजुर सभेचे अझिम नदाफ यांनीही महामंडाळाने तातडीने प्रलंबित मागण्यांची दखल घेण्याची मागणी केली. श्रमिक हक्क आंदोलनचे अध्यक्ष बी. युवराज, उपाध्यक्ष जगदीश राठोड, तसेच विनेश मेवाडे, प्रतिभा राठोड, बालाजी झुकझुके, आनंद हादीमणी इ. समिती सदस्य उपलब्ध होते. अनेक महिला बांधकाम कामगारही आवर्जुन उपस्थित होत्या.

## विश्व आयुर्वेद दिनानिमित्त नागरगाव येथे तीन हजार आयुर्वेदिक वृक्षांचे वाटप

**शिरूर । प्रतिनिधी**
नागरगाव (ता.शिरुर) राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळ, आयुष्य मंत्रालय भारत सरकार पुरस्कृत पश्चिम विभागीय औषधी वनस्पती सह सुविधा केंद्र, वनस्पतीशास्त्र विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, बाबुराव दौंडकर स्मारक समिती, रांजणगाव गणपती व भारतीय किसान संघ यांच्या संयुक्त विद्यमाने १० वा विश्व आयुर्वेद दिन दिनांक २३ सप्टेंबर २०२५ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



या निमित्ताने नागरगाव (ता. शिरुर) येथे आयुर्वेद शास्त्रात वापरल्या जाणाऱ्या औषधी वनस्पतींचे वाटप व वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. या उपक्रमात तब्बल ३ हजार औषधी वृक्षांचे रोपण करण्यात आले. यामध्ये आवळा, हिरडा, बेहडा, त्रिफळा यांसारख्या प्रमुख वनस्पतींसह विड्याचे पान, पानफुटी, मंडूकपर्णी, वेखंड, सीता अशोक इत्यादींचा समावेश होता.

नागरगाव ग्रामपंचायतीच्या विशेष ठरावानुसार एक गाव-एक औषधी वृक्ष या संकल्पनेतून नागरगावाला त्रिफळा गाव म्हणून घोषित करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. दिगंबर मोकाट यांनी आयुर्वेदिक वनस्पतींचा आरोग्यावर होणारा प्रभाव तसेच आवळा, हिरडा, बेहडा यांचा वैद्यकीय उपयोग याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले.

यावेळी भारतीय किसान संघ प्रांत कोषाध्यक्ष बबन केंजळे, जिल्हा मंत्री सतीश साकोरे, बाबुराव दौंडकर स्मारक समितीचे सदस्य तानाजी राऊत, दत्तात्रय दरेकर, वृक्षप्रेमी योगतज्ज्ञ प्रभाकर जगताप, तसेच रोटरी क्लब शिक्रापुरचे अध्यक्ष संजय तांबे तसेच गावातील सरपंच, ग्रामस्थ व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात औषधी वनस्पतींच्या महत्त्वाची माहिती देणारी पोस्टर्स, पुस्तके व माहितीपत्रके गावकऱ्यांना वितरित करण्यात आली. उपक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ. टी डी खरात व गौरी यांचे विशेष योगदान राहिले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल वाघ यांनी तर आभार सतीश साकोरे यांनी मानले.